एकमेव स्वतंत्र दैनिक

# नवाकाळ

NAVAKAL

• मुंबई, शुक्रवार ८ मे, २०२६ • वर्ष-१०४, अंक-६४, पाने-८, किंमत: ₹ ७

• R.N.I.No.1814/57 • Vol.- 104, Issue - 64 Marathi - Daily - Mumbai, 8 May, 2026 Page - 8 Price- Rs. 7/-

• संपादक- रोहित रमाकांत पांडे 24x7 : www.navakal.in Email- contact@navakal.in



नवाकाळच्या Digital बातम्या पाहण्यासाठी Scan करा!

सुवेंदु अधिकारींच्या पीएची हत्या!

navakal.in

@navakal.news Navakal Digital Network @_NDN_Offical @NavakalNews


## थोडक्यात...

### आज दहावीच्या परीक्षेचा निकाल

**मुंबई -** महाराष्ट्र राज्य माध्यमिक उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे घेण्यात आलेल्या इयत्ता दहावीच्या परीक्षेचा निकाल उद्या दुपारी एक वाजता ऑनलाईन पद्धतीने जाहीर केला जाणार आहे. या मंडळाचे सचिव डॉ. दीपक माळी यांनी अधिकृत परिपत्रकाद्वारे ही माहिती दिली. या परीक्षेसाठी ८ लाख ६५ हजार ७४० विद्यार्थी, ७ लाख ४९ हजार ७३६ विद्यार्थिनी आणि १५ तृतीयपंथी विद्यार्थ्यांनी नोंदणी केली.

### कामगार दिनी आत्मदहन महिला कर्मचाऱ्याचा मृत्यू

**धाराशिव -** धाराशिवच्या परंडा तालुक्यात कामगार दिनी १ मे रोजी भूविकास बँकेच्या महिला कर्मचारी बेबी किशनराव पाटील यांनी आत्मदहन केले होते. त्यांचा काल मध्यरात्री उपचारादरम्यान पुणे येथील ससून रुग्णालयात मृत्यू झाला आहे. बेबी पाटील या मागील तीन वर्षांपासून भूविकास बँका बंद झाल्यानंतर इतर सेवेमध्ये सामावून घेण्यासाठी आणि थकीत वेतन मिळावे, यासाठी प्रशासनाकडे पाठपुरावा करत होत्या. वारंवार मागणी करूनही त्यांच्या प्रश्नाकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप करण्यात येत आहे.

### न्या.वर्मांचा राजीनामा राष्ट्रपतींकडे प्रलंबित

**नवी दिल्ली -** दिल्लीतील शासकीय निवासस्थानी नोटांची बंडले सापडल्याने वादात अडकलेले न्यायाधीश यशवंत वर्मा यांचा राजीनामा अद्याप राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी स्वीकारलेला नाही. त्यामुळे उच्च न्यायालयाच्या पोर्टलवर आजही न्या. वर्मा यांचे नाव आहे. उच्च न्यायालयाच्या पोर्टलवर न्यायाधीशांची यादी दिली जाते. या यादीत चौथ्या क्रमांकावर न्या.वर्मा यांचे नाव आहे. अनुच्छेद २१७(१) अनुसार एखाद्या न्यायाधीशाने आपल्या राजीनाम्याचे पत्र राष्ट्रपतींना पाठवल्यानंतर ती व्यक्ती न्यायाधीशपदापासून मुक्त होते. सर्वोच्च न्यायालयाने एका खटल्यात असे म्हटले होते की, एखाद्या न्यायाधीशाचे चारित्र्य शुध्द असेल तर अपवादात्मक परिस्थितीत न्यायाधीशाने दिलेला राजीनामा मागे घेता येतो.

# आधी ११८ आमदारांच्या सह्या आणा! मगच शपथविधी

## विजय यांना पुन्हा परत पाठवले! राज्यपालांचा आडमुठेपणा

■ चेन्नई

**तामिळनाडूत** राज्यपाल विरुद्ध राज्यकर्ते या संघर्षाचा दुसरा अंक पाहायला मिळत आहे. विजय यांनी काल ११३ आमदारांचे पत्र घेऊन लोकभवनात राज्यपाल आर्लेकर यांची भेट घेतली होती. यावेळी राज्यपालांनी बहुमतासाठीचे ११८ चे संख्याबळ नसल्याचे सांगून त्यांना परत पाठवले होते. आज विजय यांनी पुन्हा राजभवनात जाऊन त्यांची भेट घेतली. परंतु आजही राज्यपालांनी टीव्हीकेकडे अद्याप आवश्यक संख्याबळ नसल्याचे सांगत बहुमताचा लेखी पाठिंबा सादर करण्यास सांगितले. राज्यपाल यांनी नमूद केले की, ११८ आमदारांच्या सह्या घेऊन या आणि टीव्हीकेकडे बहुमत असल्याचे सिद्ध करा. त्यानंतरच शपथविधी होऊ शकतो. सरकार स्थापन झाल्यानंतर ते कोसळू नये, यासाठी लेखी समर्थन आवश्यक आहे.

दरम्यान, दुसऱ्या कोणत्याही पक्षाला सरकार स्थापनेसाठी निमंत्रण दिले जाणार नसल्याचे आश्वासन राज्यपालांनी विजय यांना दिले आहे. मात्र भाजपा तामिळनाडूच्या राजकारणात हस्तक्षेप करत असल्याचा आरोप विरोधकांनी केला आहे. दलित नेते तिरुमावलवन यांनी, राज्यपालांनी विजय यांना सरकार स्थापन करण्याची संधी द्यावी आणि नंतर विधानसभेत बहुमत सिद्ध करू द्यावे, अशी मागणी केली आहे. तामिळनाडूतील कम्युनिस्ट पक्षानेही राज्यपालांनी संविधानानुसार निर्णय घ्यावा, अशी मागणी केली आहे. शपथविधीपूर्वी बहुमत सिद्ध करण्यास सांगणे अयोग्य असल्याचे पक्षाने म्हटले आहे. काँग्रेसनेही अशी प्रतिक्रिया दिली आहे की, तमिळ जनतेने स्पष्ट आणि ठोस बहुमत दिले असताना राज्यपाल अडवणूक करत आहेत. तर मक्कल निधि मय्यम पक्षाचे प्रमुख, सिनेअभिनेते कमल हसन यांनी अशी एक्स पोस्ट केली आहे की, विजय यांच्या नेतृत्वाखालील टीव्हीके या पक्षाने १०८ जागांवर विजय मिळवला पान ७ वर



**तामिळनाडू निवडणुकीत सर्वाधिक १०८ जागा जिंकूनही टीव्हीके पक्षाचे प्रमुख विजय यांचा सत्तास्थापनेचा दावा राज्यपाल राजेंद्र आर्लेकर यांनी आज सलग दुसऱ्या दिवशी फेटाळला. टीव्हीके पक्षाला काँग्रेसच्या ५ आमदारांनी पाठिंबा दिला आहे. मात्र, बहुमत सिद्ध करण्यासाठी त्यांना आणखी पाच आमदारांची गरज आहे. यावर बोट ठेवून आधी ११८ आमदारांच्या सह्या घेऊन या, त्यानंतरच शपथ घ्या, अशी आडमुठी भूमिका राज्यपालांनी घेतली. त्यामुळे आज होणारा विजय यांचा शपथविधीही रद्द करण्यात आला. यावरून लोकभवनाच्या आडून भाजपा राजकारण करत आहे, असा आरोप विरोधकांनी केला आहे. दरम्यान, फोडाफोडीच्या भीतीने अण्णा द्रमुकने आपल्या आमदारांना पुदुचेरीच्या रिसॉर्टमध्ये पाठवले आहे. त्यामुळे तामिळनाडूतील सत्ताकारण आता काय नवे वळण घेते, याकडे देशाचे लक्ष लागले आहे.**

## सुनेत्रा पवार मुख्यमंत्री होणार जय पवारांचे बारामतीत वक्तव्य



**दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार व उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांचे पुत्र जय पवार यांनी आज पहिल्यांदा बारामतीत 'जनता दरबार' आयोजित केला. या दरबाराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. यावेळी जय पवार यांनी म्हटले की २०२९ मध्ये सुनेत्रा पवार मुख्यमंत्री होतील. यावरून राजकीय वर्तुळात मोठी चर्चा सुरू झाली. जय पवार यांनी आईच्या प्रचारावेळी पुढची आमदारकीची निवडणूक मी लढवणार असे म्हटले आणि खळबळ माजली.**

■ बारामती

**जय पवार** म्हणाले की, काही दिवसांपूर्वी आमची सहकाऱ्यांसोबत चर्चा झाली. सर्वच बारामतीकरांची इच्छा होती की, दादांना एकदा मुख्यमंत्री पाहायचे आहे. आता वहिनीदेखील खूप कष्ट घेत आहेत, मला वाटते की, २०२९ मध्ये बारामतीतून विधानसभेला वहिनीच उभ्या राहतील आणि आमची सर्वांची आशा आहे की, सुनेत्रा पवार यांनी मुख्यमंत्री म्हणून जागा घ्यायला हवी.

दरम्यान, जय पवार यांनी आज बारामतीत घेतलेल्या पहिल्याच दरबारात विविध भागांतून मोठ्या संख्येने नागरिक तक्रारी घेऊन आले होते. त्यांनी आपल्या समस्या मांडल्या. जय पवार यांनी त्यांच्या तक्रारी केवळ ऐकून घेतल्या नाहीत, तर तत्काळ संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांशी दूरध्वनीवरून संपर्क साधत अनेक प्रश्न मार्गी लावले. प्रशासकीय दिरंगाई कमी करून नागरिकांना त्वरित दिलासा देण्याच्या त्यांच्या कार्यपद्धतीचे उपस्थितांनी कौतुक केले. नागरिकांच्या समस्या सातत्याने सोडवण्यासाठी दर आठवड्याच्या प्रत्येक गुरुवारी जनता दरबार आयोजित करण्यात येणार असल्याची घोषणाही जय पवार यांनी केली. सुनेत्रा पवार यांनी राज्यसभा सदस्यत्वाचा राजीनामा दिल्यानंतर रिक्त झालेल्या जागेसाठी जय पवार यांचे नाव चर्चेत असतानाच त्यांनी जनता दरबार सुरू केल्याने त्यावरून ते राज्यसभेचे खासदार बनण्यास उत्सुक असल्याचे म्हटले जात आहे. मात्र, सुनेत्रा पवार यांच्या जागी राज्यसभेच्या खासदारकीसाठी तुमचे नाव चर्चेत आहे, असा प्रश्न विचारला असता, त्यांनी उत्तर दिले की, चर्चा होत आहे. पण माझी तशी इच्छा नाही. मी इथेच सर्वांसाठी काम करेन.

## शेवटच्या पगाराच्या ५० टक्के पेन्शन राज्य कर्मचाऱ्यांना मोठा दिलासा

■ मुंबई

**राज्यातील** सुमारे १७ लाख सरकारी कर्मचारी आणि अधिकाऱ्यांच्या सुधारित निवृत्ती वेतनाच्या मागणीला अखेर यश आले आहे. राज्य शासनाने सुधारित राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजनेची कार्यपद्धती जाहीर केली आहे. त्यानुसार निवृत्तीनंतर शेवटच्या मूळ वेतनाच्या ५० टक्के रक्कम पेन्शन म्हणून दिली जाणार आहे.

मार्च २०२४ पासून ही योजना लागू करण्यात आली होती. मात्र कार्यपद्धती जाहीर न झाल्याने त्या काळापासून निवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांचे पेन्शन रखडले होते. कर्मचाऱ्यांनी वारंवार आंदोलन केल्यानंतर अखेर अर्थ विभागाने शासन आदेश काढत योजना प्रत्यक्षात लागू केली आहे. राज्य सरकारने २००५ नंतर सेवेत दाखल झालेल्या कर्मचाऱ्यांसाठी जुनी पेन्शन योजना बंद केली होती. याविरोधात २०२३ मध्ये कर्मचाऱ्यांनी मोठे आंदोलन केले होते. त्या पार्श्वभूमीवर सुधारित निवृत्तीवेतन योजनेचे आश्वासन दिले होते आणि १ मार्च २०२४ पासून ही योजना पूर्वलक्ष्यी प्रभावाने लागू केली आहे. या पान ७ वर

## चंद्रनाथ रथ यांची हत्या पूर्वनियोजित तृणमूलचा हात! भाजपाचा आरोप

### ममता बॅनर्जींचे मंत्रिमंडळ बरखास्त

ममता बॅनर्जी यांनी विधानसभा निवडणुकीतील पराभवानंतर मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा देण्यास नकार दिला होता. आमचे सरकार बरखास्त करा, पण मी राजीनामा देणार नाही, असा आक्रमक पवित्रा ममता बॅनर्जी यांनी घेतला होता. या सत्तासंघर्षानंतर अखेर बंगालचे राज्यपाल आर. एन. रवि यांनी पश्चिम बंगाल मंत्रिमंडळ बरखास्त केले. त्यामुळे ममता बॅनर्जी यांचे मुख्यमंत्रिपद अधिकृतरित्या संपुष्टात आले आहे.

■ कोलकाता

**पश्चिम** बंगालमधील भाजपा नेते सुवेंदू अधिकारी यांचे



निकटवर्तीय आणि वैयक्तिक सहाय्यक चंद्रनाथ रथ यांची काल रात्री मध्यग्राम येथे गोळ्या झाडून हत्या करण्यात आली. ही हत्या पूर्वनियोजित होती. तृणमूलचा त्यात हात होता, असा दावा सुवेंदू अधिकारी यांनी केला आहे. दरम्यान, पश्चिम बंगाल पोलिसांनी या हत्येचा छडा लावण्यासाठी एसआयटी स्थापन केली आहे. पोलिसांनी याप्रकरणी ३ जणांना अटक केली आहे.

निकालानंतर पश्चिम बंगालमध्ये ठिकठिकाणी हिंसाचाराच्या घटना घडत असून, रथ यांच्या हत्येमुळे राज्यातील राजकीय वातावरण आणखी तापले आहे. पोलिसांच्या पान ७ वर

## सोहराबुद्दीन शेख चकमक सर्व आरोपी निर्दोष

### हायकोर्टाचेही शिक्कामोर्तब

■ मुंबई

**सोहराबुद्दीन** शेख कथित बनावट चकमकप्रकरणी सर्व २२ आरोपींची निर्दोष मुक्तता करण्याच्या कनिष्ठ न्यायालयाच्या निर्णयावर मुंबई उच्च न्यायालयाने शिक्कामोर्तब केले. कनिष्ठ न्यायालयाच्या निर्णयाला सोहराबुद्दीनचे भाऊ रुबाबुद्दीन आणि नयाबुद्दीन यांनी उच्च न्यायालयात आव्हान दिले होते. या प्रकरणी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा हेही आरोपी होते. मात्र, सत्र न्यायालयाने त्यांना खटल्यापूर्वीच दोषमुक्त केले होते.

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

कनिष्ठ न्यायालयाने दिलेला सर्व आरोपींना निर्दोष ठरवण्याचा निर्णय रद्द करावा किंवा भारतीय दंड विधान संहिता कलम ३८६ (अ) अन्वये हा खटला पुन्हा नव्याने चालवण्याचे आदेश कनिष्ठ न्यायालयाला द्यावेत, अशी विनंती शेखच्या भावांनी केली होती.


हा संपूर्ण खटला अशा पद्धतीने चालवला गेला की अंतिमतः पीडितांना न्याय मिळू नये. विशेष न्यायाधीशांनी केवळ तर्कावर आधारित आणि तथ्यहीन पुराव्यांवर विश्वास ठेवून निकाल दिला आहे. जे साक्षीदार उलटले त्यांनी ज्या दंडाधिकाऱ्यासमोर साक्ष दिली होती त्या दंडाधिकाऱ्यांना न्यायालयासमोर आणण्याचे कष्ट पोलिसांनी घेतले नाहीत.

## टाटा सन्सची बिगर बँकिंग वित्तीय संस्था म्हणून नोंदणी झालीच पाहिजे

■ नवी दिल्ली

**टाटा** सन्सची शेअर बाजारात नोंदणी करण्यावरून सुरू असलेल्या वादात आता नवी भर पडली आहे. इनगव्हर्न रिसर्च सर्व्हिसेस कंपनीचे संस्थापक आणि व्यवस्थापकीय संचालक श्रीराम सुब्रमणियन यांनी रिझर्व्ह बँकेला पत्र लिहून टाटा सन्सची बिगर बँकिंग वित्तीय संस्था (एनबीएफसी) म्हणून नोंदणी झालीच पाहिजे, अशी आग्रही मागणी केली आहे.

टाटा सन्स ही टाटा उद्योग समूहातील शेअर बाजारात सुचीबद्ध असलेल्या कंपन्यांची होल्डिंग कंपनी आहे. मात्र टाटा सन्स ही पब्लिक लिमिटेड कंपनी नसून प्रायव्हेट लिमिटेड कंपनी आहे. त्यामुळे ती शेअर



### सुब्रमणियन यांचे रिझर्व्ह बँकेला पत्र

बाजारात सुचीबद्ध झालेली नाही. मात्र समूहातील अन्य सात कंपन्या शेअर बाजारात सुचीबद्ध आहेत. या कंपन्या शेअर विक्रीच्या माध्यमातून सर्वसामान्य गुंतवणुकदारांकडून भांडवल उभारते. टाटा सन्स ही या सात कंपन्यांची होल्डिंग कंपनी म्हणजेच पितृ कंपनी असल्यामुळे टाटा सन्सच्या संचालक मंडळाला या सात कंपन्यांनी जनतेकडून उभारलेल्या भांडवलावर अप्रत्यक्ष अधिकार प्राप्त होतो. हे रिझर्व्ह बँकेच्या नियमात बसत नाही. त्यामुळे टाटा सन्सला बिगर बँकिंग वित्तीय संस्था म्हणून नोंदणी करून शेअर बाजारात सुचीबद्ध होणे आवश्यक आहे, असे सुब्रमणियन यांचे म्हणणे आहे.

## नसरापूर अत्याचार-हत्या प्रकरण आरोपीला १२ मेपर्यंत पोलीस कोठडी

■ पुणे

**पुणे** जिल्ह्यातील नसरापूर येथे एका अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार करून तिची हत्या केल्याप्रकरणी आरोपीला पुणे न्यायालयाने १२ मेपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. सुरक्षेच्या कारणास्तव आरोपीला न्यायालयात प्रत्यक्ष हजर न करता दूरचित्र प्रणालीद्वारे विशेष न्यायाधीश एम. जी. चव्हाण यांच्यासमोर हजर करण्यात आले.

सुनावणीदरम्यान तपास अधिकारी विजयमाला पवार आणि विशेष सरकारी वकील अरुंधती ब्रह्मे यांनी आरोपीच्या पोलीस कोठडीची मागणी केली. आरोपीची वैद्यकीय तपासणी, रासायनिक विश्लेषण अहवाल आणि इतर पुरावे तपासणे आवश्यक असल्याचे न्यायालयाला सांगण्यात आले. तसेच आरोपीने यापूर्वी अशा प्रकारचे गुन्हे केले आहेत का, याचाही तपास करणे गरजेचे असल्याचे नमूद करण्यात आले. मुलीच्या हत्येसाठी वापरलेले हत्यार अद्याप हस्तगत करायचे असून, महत्त्वाचे पुरावे गोळा करणे बाकी आहे. तसेच आरोपीला मुलीसोबत पाहिलेल्या साक्षीदारांचे जबाब नोंदवण्याचे काम सुरू असल्याची माहितीही न्यायालयाला देण्यात आली. न्यायालयाने गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन आरोपीला आणखी पाच दिवसांची वाढीव पोलीस कोठडी सुनावली आहे.

## भोजशालात मंदिराच्या जागेवर मशीद बांधली पुरातत्त्व विभागाचा उच्च न्यायालयात दावा

**मध्य प्रदेशमधील भोजशाला मंदिर-कमाल मौला मशीद वादात भारतीय पुरातत्त्व विभागाने (एएसआय) काल मध्य प्रदेश उच्च न्यायालयात मोठा दावा केला. ज्या जागेवर कमाल मौला मशीद सध्या उभी आहे त्या जागी उत्खनन केले असता परामर राज्याच्या काळातील मंदिराचे अवशेष आढळून आले असून, ही मशीद मंदिराच्या अवशेषांवर बांधण्यात आली आहे, असे एएसआयने अहवालामध्ये नमूद केले आहे.**



■ इंदूर

**पुरातत्त्व** खात्याने या ठिकाणी सलग ९८ दिवस वैज्ञानिक सर्वेक्षण करून २ हजार पानांचा अहवाल न्यायालयात सादर केला. या अहवालात त्यांनी हा दावा केला आहे.

भोजशाला हे वाग्देवीचे (देवी सरस्वती) मंदिर आहे, असा हिंदूंचा दावा आहे. लतर ही कमाल मौला मशीद आहे, असा मुस्लिमांचा दावा आहे. या वादग्रस्त पान ७ वर

## भोंदू खरातच्या बँक लॉकरमधून 1 कोटींच्या सोन्यासह डॉलर जप्त

■ नाशिक

**महिलांचे** लैंगिक शोषण आणि खंडणी प्रकरणात अटकेत असलेला भोंदूबाबा अशोक खरात आणि त्याची पत्नी कल्पना यांच्या नाशिकच्या विश्वास को-ऑपरेटिव्ह बँकेमधील लॉकरची झडती आज ईडीने घेतली. या कारवाईदरम्यान लॉकरमधून कोट्यवधींची मालमत्ता जप्त केली होती. खरातच्या मुलीच्या उपस्थितीत ईडीने लॉकर उघडून तपास केला. यामध्ये सुमारे १.१० कोटी रुपये किमतीचे सोन्याचे दागिने, ५५०० अमेरिकन डॉलर (सुमारे ५.१९ लाख रुपये) परदेशी चलन आणि १.८९ लाख रुपयांचे चांदीचे दागिने जप्त केले आहेत.

एप्रिल महिन्यात ईडीने नाशिक, पुणे आणि शिर्डी येथील खरातशी संबंधित ठिकाणांवर छापेमारी केली होती. त्यावेळी २.४ कोटी रुपयांचा बँक निधी गोठवण्यात आला होता. तसेच ४२ लाख रुपये रोख रक्कम आणि कोट्यवधी रुपयांच्या ९० मालमत्तांची कागदपत्रे जप्त केली होती.

## बिहारमध्ये सम्राट मंत्रिमंडळाचा विस्तार नितीश पुत्रासह ३२ मंत्र्यांचा शपथविधी

■ पाटणा

**बिहारचे** मुख्यमंत्री सम्राट चौधरी यांनी मुख्यमंत्रिपदाची सूत्रे हाती घेतल्यानंतर २२ दिवसांनी आज मंत्रिमंडळाचा विस्तार करण्यात आला. या भव्य कार्यक्रमात नितीश कुमार यांचे पुत्र निशांत कुमार यांच्यासह ३२ मंत्र्यांनी शपथ घेतली. शपथविधी कार्यक्रमाला पंतप्रधान नरेंद्र मोदीदेखील उपस्थित होते. कार्यक्रमानंतर पंतप्रधानांनी नितीश कुमार यांना मंचावर जवळ बोलावून हस्तांदोलन केले. यावेळी नितीश कुमार यांनी पंतप्रधानांच्या खांद्यावर हात ठेवला.

नवीन मंत्रिमंडळात




भाजपाचे १५, जदयूचे १३, लोक जनशक्ती पार्टीचे २ तसेच एचएएम आणि आरएलएम पक्षाचे प्रत्येकी एक मंत्री आहेत. सुमारे २५ मिनिटे चाललेल्या या कार्यक्रमात पाच-पाच आमदारांच्या गटाने शपथ घेतली. पहिल्या फेरीत निशांत कुमार, श्रवण कुमार, विजय सिन्हा, लेसी सिंह व दिलीप जायस्वाल यांनी शपथ घेतली. पान ७ वर

# मोरा बंदर ते मुंबई दरम्यान रो-रो सेवा प्रकल्प रखडला

## एप्रिलचा मुहूर्त टळला

■ उरण

**मोरा** बंदर ते मुंबई-भाऊचा धक्का दरम्यानची बहुप्रतिक्षित रो-रो सेवा विविध तांत्रिक आणि प्रशासकीय कारणांमुळे दीर्घकाळापासून रखडली आहे. ही सेवा गेल्या एप्रिल महिन्यात सुरू होणार होती. परंतु हा प्रकल्प सुरू होण्याचा मुहूर्तही टळला आहे.

२०१८ पासून हे काम सुरू आहे, परंतु सध्या केवळ जेट्टीचा सांगाडा तयार असून काम कासव गतीने सुरू आहे. वारंवार मुदतवाढ मिळाल्यानंतर, आता ही सेवा एप्रिलपर्यंत सुरू



करण्याचे उद्दिष्ट होते, पण हा मुहूर्तही आता टळला आहे. सध्या एकूण कामापैकी केवळ ३८ ते ५० टक्के काम पूर्ण झाल्याचा अंदाज आहे. तांत्रिक अडचणी आणि कामातील विलंबामुळे या प्रकल्पाचा खर्च ५० कोटींवरून ७५ कोटी रुपयांवर पोहोचला आहे. जेट्टीचे अपूर्ण बांधकाम आणि जेट्टीपर्यंत जाणाऱ्या रस्त्यांचे काम अजूनही पूर्ण झालेले नाही. ही सेवा सुरू झाल्यास उरण आणि रायगड भागातील प्रवाशांना आपली चारचाकी, दुचाकी वाहने बोटीने थेट मुंबईला भाऊचा धक्का येथे नेता येतील. त्यामुळे प्रवासाचा वेळ आणि अंतर लक्षणीयरीत्या कमी होईल.

# डोंबिवलीच्या सामाजिक कार्यकर्त्या जयश्री जोशी यांचे निधन

■ मुंबई

**डोंबिवली** येथील राष्ट्र सेविका समितीच्या ज्येष्ठ कार्यकर्त्या जयश्री विनोद जोशी यांचे आज दुपारी निधन झाले. मृत्युसमयी त्यांचे वय ७२ होते.

जयश्री जोशी या धुळे जिल्ह्यातील दोंडाईचे येथील संघचालक कै. गोविंदशास्त्री जोशी यांच्या त्या ज्येष्ठ कन्या होत. त्या राष्ट्र सेविका समितीच्या जिजामाता शाखेच्या स्वयंसेविका होत्या. याशिवाय महिला मंडळ, डोंबिवली पश्चिम भजनी मंडळ या संस्थांच्याही सक्रिय कार्यकर्त्या होत्या. ज्येष्ठ नागरीक संघ आयोजित विविध उपक्रमात त्यांचा सहभाग होता. डोंबिवली पूर्व भागातील शिवमंदिर रोड स्मशानभूमीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्याच्या पश्चात दोन मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

# कलिंगड खाऊन मृत्यू झाला नाही उंदीर मारण्याच्या औषधाने झाला



■ मुंबई

**पायधुनी** येथील डोकाडिया कुटुंबातील चार सदस्यांचा मृत्यू बिर्याणी व कलिंगड खाल्ल्यानंतर काही दिवसांपूर्वी झाला होता. सुरुवातीला हे अन्नातून विषबाधा झाल्याचे प्रकरण असल्याचे सांगितले जात होते. मात्र ११ दिवसांनंतर आलेल्या अहवालात धक्कादायक माहिती समोर आली आहे. या चौघांचा मृत्यू उंदीर मारण्याच्या औषधाने झाला असल्याचे तपासातून निष्पन्न झाले आहे. डोकाडिया कुटुंबातील सदस्यांच्या शरीरात उंदीर मारण्याच्या औषधाचे घटक झिंक फॉस्फाईड आढळल्याची माहिती हाती आली आहे.

त्यामुळे काही प्रमाणात मृत्यूचे गूढ उकलले आहे. मात्र हे उंदीर मारण्याचे औषध खाऊन त्यांनी आत्महत्या केली की, त्यांना ते कोणी खाऊ घातले की, फळाला लावले जाणाऱ्या उंदराच्या औषधाने त्याचा मृत्यू झाला हे अद्याप स्पष्ट झाले नाही. त्यामुळे पायधुनी पोलीस या प्रकरणाचा अधिक तपास करत असून, हे औषध त्यांच्या अन्नात कसे गेले किंवा यामागे इतर काही कारण आहे का, याचा शोध घेतला जात आहे. अशा घटना टाळण्यासाठी घरात उंदीर मारण्याचे औषध किंवा इतर कीटकनाशके अन्नपदार्थांपासून लांब आणि सुरक्षित ठिकाणी ठेवण्याचे आवाहन पोलिसांकडून करण्यात येत आहे.

# महामार्गावरील खड्ड्यांवरून संताप अंबादास दानवेंचे गडकरींना पत्र

■ छत्रपती संभाजीनगर

**छत्रपती** संभाजीनगर ते नाशिक महामार्गावरील खड्ड्यांमुळे अपघातांच्या प्रमाणात वाढ झाली आहे. याबाबत विधान परिषदेचे माजी विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांना पत्र लिहून गंभीर चिंता व्यक्त केली आहे.

नागरिकांच्या जीविताला धोका निर्माण झाल्याचे नमूद करत तातडीने उपाययोजना करण्याची मागणी त्यांनी केली आहे. दानवे यांनी विशेषतः वैजापूरजवळील चार ते पाच किलोमीटरचा पट्टा अत्यंत धोकादायक बनल्याचे पत्रात नमूद केले आहे. या परिसरात गेल्या काही महिन्यांत अनेक अपघात घडल्याने स्थानिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. खराब रस्त्यांमुळे वाहनांचे संतुलन बिघडून अपघात घडत आहेत. विशेषतः पावसाळ्यात खड्ड्यांमध्ये पाणी साचल्याने त्यांचा अंदाज येत नाही आणि त्यामुळे अपघातांचे प्रमाण वाढत आहे. प्रशासनाकडून वेळोवेळी दुरुस्ती केल्याचा दावा केला जात असला तरी प्रत्यक्षात परिस्थितीत सुधारणा दिसत नसल्याचा आरोप दानवे यांनी केला आहे.

# नाशिकमध्ये सासरच्या छळाला कंटाळून विवाहितेची आत्महत्या

## पतीसह दोघांना अटक

■ नाशिक

**नाशिकच्या** जेलरोड परिसरात सासरच्या छळाला कंटाळून एका विवाहितेने आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. हुंड्यासाठी होणारा छळ, पतीचे कथित अनैतिक संबंध आणि सततच्या मानसिक त्रासाला कंटाळून आशा प्रवीण घोटेकर यांनी टोकाचे पाऊल उचलल्याचा आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणी मृत विवाहितेच्या भावाने



दिलेल्या तक्रारीवरून उपनगर पोलिसांनी पतीसह दोघांना अटक केली असून परिसरात खळबळ उडाली आहे.

या तक्रारीनुसार आशा घोटेकर यांचा विवाह झाल्यापासूनच सासरच्या मंडळींकडून त्यांचा मानसिक आणि शारीरिक छळ सुरू होता. फ्लॅट खरेदी करण्यासाठी आणि चारचाकी वाहन घेण्यासाठी सासरच्यांनी २५ लाख रुपयांची मागणी केली होती. बहिणीचा संसार सुखाचा व्हावा, यासाठी भावाने आईच्या नावावरील जमीन विकून सासरच्यांना पैसे दिले होते. तसेच लग्नावेळी २१ तोळे सोनेही देण्यात आले होते. इतकी मोठी रक्कम आणि सोने देऊनही सासरच्यांची मागणी कायम होती, असा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. आशा यांच्या पतीचे दुसऱ्या एका महिलेशी अनैतिक संबंध असल्याचाही आरोप करण्यात आला आहे. आशा यांचा वारंवार मानसिक आणि शारीरिक छळ केला जात होता.

# भ्रूणहत्या रोखण्यासाठी समिती स्थापन वसईच्या आ.स्नेहा दुबे-पंडित यांची निवड

■ वसई

**गर्भधारणापूर्व** व प्रसवपूर्व निदानतंत्र (लिंग निवड प्रतिबंध) अधिनियमाअंतर्गत कायद्याची अंमलबजावणी करण्यासाठी तसेच नोंदणीकृत सोनोग्राफी केंद्राची तपासणी करण्यासाठी राज्य शासनाने राज्यस्तरीय तपासणी व संनियंत्रण समिती पुनर्गठीत केली आहे. या समितीत वसईच्या आमदार स्नेहा दुबे-पंडित यांची सदस्य म्हणून निवड करण्यात आली आहे.

सार्वजनिक आरोग्य मंत्री या समितीचे अध्यक्ष असून त्यात एकूण १८ सदस्य आहेत. समितीचा कार्यकाळ ३ वर्षांचा असणार आहे. गर्भलिंग कायद्याच्या अंमलबजावणीचे संनियंत्रण करणे, सोनोग्राफी केंद्राची तपासणी करणे, केंद्रात त्रुटी आढळल्यास कारवाईचे निर्देश देणे आदी कामे ही समिती करणार आहे. ही नियुक्ती राज्यातील महिलांच्या सन्मान, सुरक्षितता आणि कन्याभ्रूण हत्येसारख्या गंभीर गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

# फ्रेंच कंपनीला भांडूप आणि पांजरापुरातील दोन मोठ्या जलशुद्धिकरण प्रकल्पांची कंत्राटे

■ मुंबई

**व्हिओलिया** या फ्रान्सच्या कंपनीला मुंबईतील भांडूप आणि पांजरापूर येथील दोन मोठ्या जलशुद्धीकरण प्रकल्पांची कंत्राटे मिळाली आहेत. हे दोन्ही प्रकल्प मिळून शहराच्या ६० टक्क्यांहून अधिक पाण्याची गरज पूर्ण करतील, अशी अपेक्षा आहे. हे प्रकल्प २०३० पर्यंत कार्यान्वित होणार आहेत. व्हिओलिया या प्रकल्पांसाठी तांत्रिक सहाय्य पुरवणार असून पुढील १५ वर्षे संचालन आणि देखभालही करणार आहे. महापालिका अधिकाऱ्यांच्या मते, मुंबईच्या महानगरपालिका जलक्षेत्रात फ्रेंच कंपनीला देण्यात आलेल्या सर्वात मोठ्या कंत्राटांपैकी ही दोन आहेत.

यातील मोठा प्रकल्प भांडूप वॉटर ट्रीटमेंट प्लांट येथे उभारला जात आहे. हा प्रकल्प आशियातील सर्वात मोठ्या जलशुद्धीकरण केंद्रांपैकी एक मानला जातो. २,००० दशलक्ष लिटर प्रतिदिन क्षमतेचा हा नवीन प्रकल्प ७.४ हेक्टर जागेवर उभारला जात असून १९७९ मध्ये सुरू झालेल्या जुन्या बॉम्बे-१ प्रकल्पाची जागा घेणार आहे. ४,१२४ कोटी रुपयांचा हा प्रकल्प वेलस्पन एंटरप्रायझेस यांना देण्यात आला असून व्हिओलिया तांत्रिक भागीदार म्हणून कार्यरत आहे. अधिकाऱ्यांनी सांगितले की, क्षमतेच्या दृष्टीने हा आगामी प्रकल्प जगातील सर्वात मोठ्या जलशुद्धीकरण केंद्रांपैकी एक असेल. याचवेळी, वेलस्पन पांजरापूर येथे, भिवंडीजवळ ९१० दशलक्ष लिटर प्रतिदिन क्षमतेचा आणखी एक जलशुद्धीकरण प्रकल्प विकसित करत आहे.

# उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंचे हेलिकॉप्टर वादळात अडकले

■ मुंबई

**उपमुख्यमंत्री** एकनाथ शिंदे आज महालक्ष्मी रेसकोर्स येथून मुरबाडमधील एका लग्नसोहळ्यासाठी जात असताना त्यांचे हेलिकॉप्टर कल्याण परिसरात अचानक आलेल्या वादळात अडकले. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन वैमानिकाने तत्काळ निर्णय घेत मुंबईतील जुहू येथे हेलिकॉप्टरचे सुरक्षित आपत्कालीन लँडिंग केले. या प्रवासात उपमुख्यमंत्र्यांसह एकूण आठ जण होते. यामध्ये त्यांचे स्वीय सहाय्यक प्रभाकर काळे, मुख्य जनसंपर्क अधिकारी विनायक पात्रुडकर, ओएसडी राजपूत, मुख्य सुरक्षा अधिकारी आणि इतर कर्मचारी यांचा समावेश होता. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी किंवा दुखापत झालेली नाही.

# उपचारादरम्यान रुग्णाचा मृत्यू! उल्हासनगरात रुग्णालयात राडा

## डॉक्टरांचे काम बंद आंदोलन

■ उल्हासनगर

**उल्हासनगर** येथील शासकीय मध्यवर्ती रुग्णालयात उपचारादरम्यान एका रुग्णाचा मृत्यू झाल्यानंतर संतप्त नातेवाईकांनी रुग्णालयात तोडफोड केल्याची गंभीर घटना घडली. या प्रकारामुळे भयभीत झालेल्या डॉक्टर आणि कर्मचाऱ्यांनी आज सकाळी तातडीने काम बंद आंदोलन पुकारले.

भगवान निंभोरे यांना रात्री उशिरा उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. मृत्यूची माहिती मिळताच नातेवाईकांनी डॉक्टरांच्या हलगर्जीपणामुळेच हा मृत्यू झाल्याचा आरोप करत रुग्णालयात गोंधळ घातला. यावेळी काही जणांनी डॉक्टरांचे दालन, कर्मचारी कक्ष तसेच वैद्यकीय उपकरणांची मोठ्या प्रमाणावर तोडफोड केली. या घटनेनंतर रुग्णालयात तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले. सुरक्षेचा अभाव आणि वारंवार घडणाऱ्या अशा घटनांमुळे डॉक्टर आणि कर्मचाऱ्यांनी काम बंद आंदोलन केले. रुग्णालयात शस्त्रधारी पोलीस तैनात करावेत आणि दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली. नंतर प्रशासनाने तातडीची बैठक घेऊन कर्मचाऱ्यांच्या मागण्या मान्य करण्याचे आश्वासन दिले. तोडफोड करणाऱ्यांना अटक करण्यात येईल, तसेच भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी रुग्णालयात कायमस्वरूपी पोलीस बंदोबस्त ठेवण्यात येईल, असे सांगण्यात आले. या आश्वासनानंतर डॉक्टरांनी आपले आंदोलन मागे घेतले.

# एपस्टिनची 'सुसाईड नोट' पाच वर्षांनंतर समोर आली



■ न्यूयॉर्क

**जगभरात** खळबळ माजवणाऱ्या एपस्टिन फाईल प्रकरणात मोठा खुलासा झाला आहे. जेफ्री एपस्टिनच्या मृत्यूच्या पाच वर्षांनंतर न्यूयॉर्कमधील फेडरल न्यायालयाने एपस्टिनने मृत्यूपूर्वी लिहिलेली कथित 'सुसाईड नोट' सार्वजनिक केली आहे. या पत्रात एपस्टिन म्हणाला की, महिनोनमहिने माझी चौकशी झाली, पण काहीच सापडले नाही. निरोप घेण्याची वेळ स्वतः निवडता येणे, ही एक प्रकारे संधी आहे. तुम्हाला काय वाटते, मी काय करावे? रडत बसू? पत्राच्या शेवटी 'नो फन' आणि 'नॉट वर्थ इट' असे शब्द लिहून त्याने आपली मानसिक अवस्था व्यक्त केली आहे. हे पत्र न्यूयॉर्कमधील मॅनहॅटन तुरुंगातील त्याच्या सेलमध्ये सापडल्याचे सांगितले जाते.

विशेष म्हणजे, हे पत्र त्याचा तत्कालीन सेलमेट निकोलस टार्टाग्लिओन याच्याकडे मिळाले होते. टार्टाग्लिओन हा माजी पोलीस अधिकारी असून सध्या हत्येच्या गुन्ह्यात जन्मठेपेची शिक्षा भोगत आहे. दरम्यान, द न्यूयॉर्क टाइम्स यांनी या पत्राच्या सार्वजनिकतेसाठी न्यायालयात याचिका दाखल केली होती. त्यानंतर न्यायाधीश केनेथ करास यांनी हे पत्र उघड करण्याचे आदेश दिले.

# मुंबईतील स्वयंचलित दरवाजांच्या लोकलची चाचणी उत्तर प्रदेशात

■ मुंबई

**मध्य** रेल्वेने स्वयंचलित दरवाजे असलेली अत्याधुनिक १२ डब्यांची विना-वातानुकूलित साधी लोकल तयार केली असून, प्रवासी सुरक्षा आणि सोयीसाठी हे महत्त्वाचे पाऊल मानले जात आहे. मात्र, मुंबईकरांसाठी तयार करण्यात आलेल्या या लोकलची चाचणी मुंबईत न करता उत्तर भारतात सुरू करण्यात आली आहे. देशातील पहिल्या स्वयंचलित दरवाजांच्या साध्या लोकलची सध्या उत्तर प्रदेश-मध्य प्रदेश सीमेवरील खजुराहो-महोबा या सुमारे ६३ किलोमीटरच्या मार्गावर चाचणी सुरू आहे. झाशी विभागांतर्गत येणारा हा मार्ग तुलनेने कमी वाहतुकीचा असल्याने तांत्रिक चाचण्यांसाठी योग्य मानला जातो. ही लोकल चेन्नई येथील कारखान्यात तयार करण्यात आली आहे. यापैकी पहिला रेक काही दिवसांपूर्वी मुंबईतील कुर्ला येथील कारशेडमध्ये दाखल झाला.

# मिरा-भाईंदरचा १३८ कोटींचा मंजूर निधी परत गेला

■ भाईंदर

**मिरा-भाईंदर** शहराच्या विविध विकासकामांसाठी मंजूर करण्यात आलेला १३८ कोटींचा निधी नगरविकास खात्याने ठाण्यात वळवला आहे. या नामुष्कीचे खापर भाजपा आणि शिवसेना या दोन्ही पक्षांनी एकमेकांवर फोडले आहे.

मिरा-भाईंदर शहराच्या विकासासाठी राज्य शासनाने मागील २ वर्षात १३८ कोटींचा निधी मंजूर केला होता. त्यात नवीन कचरा प्रकल्पासाठी ३९ कोटी, उत्तन कचरा प्रकल्पासाठी १३ कोटी, मलनिस्सारण केंद्रासाठी १२ कोटी, पेणकरपाडा कचरा कंपोस्टिंग प्रकल्पासाठी ३० कोटी, महाजन कलादालनासाठी १४ कोटी आदी प्रमुख कामांचा समावेश होता. मात्र ही कामे सुरू न झाल्याने हा निधी

## शिवसेना भाजपाचे परस्परांवर आरोप

ठाणे महापालिकेकडे वर्ग करण्यात आला आहे. भाजपा आमदार नरेंद्र मेहता यांनी ही कामे होऊ न दिल्याने निधी परत गेल्याचा आरोप परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी केला होता. यानंतर दोन्ही पक्षांकडून आरोप प्रत्यारोप सुरू झाले आहेत.

नगरविकास खाते तुमच्या पक्षाकडे आहे. तुम्ही मंत्री आहात तरी निधी कसा गेला? असा सवाल भाजपाने केला आहे. सरनाईक यांनी भाजपा आमदार, महापौरांशी समन्वय साधला असता तर निधी परत गेला नसता, असे भाजपाचे प्रवक्ते डॉ. सुरेश येवले यांनी सांगितले. शिवसेनेनेही या आरोपाला प्रत्युत्तर दिले आहे. सरनाईक यांनी यापूर्वी शहराच्या विकासासाठी २ हजार ८०० कोटींचा निधी आणला होता. मात्र नरेंद्र मेहता सत्तेत आल्यावर विकास कामांना खीळ बसली, असा आरोप शिवसेना प्रवक्ते दीप काकडे यांनी केला आहे.

# आजारपणातून सावरल्यानंतर शरद पवारांचा सातारा दौरा

■ सातारा

**राज्यसभा** खासदारकीची शपथ घेतल्यानंतर प्रकृती बिघडल्यामुळे शरद पवार यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. त्यानंतर उपचार पूर्ण करून ते घरी परतले आहेत. काही दिवस विश्रांती घेतल्यानंतर ते पुन्हा सक्रिय झाले आहेत. त्यांचा पहिलाच दौरा साताऱ्यात होत आहे.

दिवंगत नेते यशवंतराव चव्हाण यांच्या कार्यभूमीतून ते सार्वजनिक कार्यक्रमाला उपस्थित राहणार असल्याने या दौऱ्याकडे राज्याचे लक्ष लागले आहे. रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या ६७व्या पुण्यतिथीनिमित्त साताऱ्यात मोठा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमात शरद पवार अध्यक्षस्थान भूषवणार आहेत. शरद पवार हे ८ मे रोजी संध्याकाळी साताऱ्यात येणार असून, ९ मे रोजी सकाळी साडेआठ वाजता ते कर्मवीर समाधीचे दर्शन घेतील.

# बीडमध्ये २२ तास मृत बाळ आईच्या पोटात! डॉक्टरांवर हलगर्जीचा आरोप

## कुटुंबियांचा विलंबाचा आरोप

■ बीड

**बीडच्या** परळी शहरातील एका खासगी रुग्णालयातील डॉक्टरांनी उपचारावेळी हलगर्जीपणा केल्यामुळे गर्भातील बाळाचा मृत्यू झाल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. धक्कादायक बाब म्हणजे, बाळाचा मृत्यू झाल्यानंतरही मृत भ्रूण संबंधित गरोदर महिलेच्या पोटात तब्बल २२ तास ठेवण्यात आल्याचा आरोप तक्रारदार कुटुंबियांनी केला आहे.

या प्रकरणी संबंधित तक्रारदार वैजनाथ संभाजी मुंडे यांनी हॉस्पिटलच्या महिला डॉक्टरविरोधात पोलिसांत तक्रार दिली आहे. या तक्रारीनुसार, त्यांच्या पत्नीवर गेल्या काही महिन्यांपासून संबंधित डॉक्टरांकडे उपचार सुरू होते. दरम्यान, अचानक पोटदुखीचा त्रास सुरू झाल्यानंतर त्यांनी डॉक्टरांशी संपर्क साधला. डॉक्टरांनी तातडीने रुग्णालयात येण्यास सांगितले. रुग्णालयात दाखल केल्यानंतरही योग्य वेळी तपासणी आणि आवश्यक उपचार करण्यात आले नाहीत, असा आरोप करण्यात आला आहे. सोनोग्राफीसाठी गर्भवती महिलेला बाहेरील केंद्रावर पाठविण्यात आले. तेथील तपासणीत गर्भातील बाळाचा मृत्यू झाल्याचे सांगण्यात आले. तरीही आवश्यक वैद्यकीय निर्णय घेण्यात विलंब करण्यात आल्याचा आरोप कुटुंबियांनी केला आहे. उपचाराच्या नावाखाली वारंवार पैशांची मागणी करण्यात आल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. डॉक्टरांच्या निष्काळजीपणामुळे गर्भातील बाळाचा मृत्यू झाला, मृत भ्रूण बाहेर काढण्यासाठी तब्बल २२ तास विलंब करण्यात आला. याप्रकरणी जिल्हाशल्य चिकित्सक सतिशकुमार साळुंखे यांनी तातडीने ४ सदस्यीय समितीची नियुक्ती केली आहे.

# कुडाळमधील पोटनिवडणुकीत शिंदे सेनेची मुसंडी

■ कुडाळ

**सिंधुदुर्ग** जिल्ह्यातील कुडाळ तालुक्यात ग्रामपंचायतींच्या पोटनिवडणुकीत आमदार निलेश राणे यांच्या नेतृत्वाखालील शिंदे शिवसेनेने जोरदार मुसंडी मारली आहे. तालुक्यातील अनेक ग्रामपंचायतींमध्ये एकतर्फी विजय मिळवत शिंदे गटाने आपला बालेकिल्ला अधिक मजबूत केला आहे.



कुडाळ तालुक्यातील कडावल ग्रामपंचायत बिनविरोध जिंकण्याबरोबरच तालुक्यातील अन्य ४ ग्रामपंचायती आणि मालवणमधील वराड व धामापूरमध्ये शिवसेनेने एकतर्फी विजय संपादन केला. चेंदवण ग्रामपंचायतीत ३ पैकी २ जागांवर शिवसेना पक्षाच्या सायली नाईक आणि अनुष्का ठुबरे यांनी विजय मिळवला.

गावराई सदस्यपदी अक्षता अमित राणे, बांबी सदस्यपदी दीप्ती परब आणि अणाव ग्रामपंचायत सदस्यपदी शिवसेनेच्या उमेदवाराची बिनविरोध निवड झाली आहे. मालवण तालुक्यातही शिवसेनेने आपल्या विजयाची मालिका सुरूच ठेवली आहे.

वराड सरपंचपदाच्या अत्यंत चुरशीच्या निवडणुकीत शिवसेनेच्या उमेदवाराने एकतर्फी विजय मिळवला. तसेच धामापुर ग्रामपंचायतीत २ पैकी २ सदस्य निवडून आणत विरोधकांना चारीमुंड्या चीत केले आहे. चौके येथील सरपंचपद गाव पॅनेलकडे गेले असून, कालेली वगळता सवंच जागांवर शिवसेनेने आपले वर्चस्व सिद्ध केले आहे.

# मे महिन्याच्या उन्हाळ्यात चारधाम यात्रेत बर्फवृष्टी

■ डेहराडून

**उत्तराखंडातील** उत्तरकाशी जिल्ह्यातील यमुनोत्री धाम येथे निसर्गाचा एक आगळावेगळा चमत्कार पाहायला मिळाला आहे. मे महिन्याच्या कडाक्याच्या उन्हात यमुनोत्रीमध्ये पावसासह चक्क हिमवर्षाव झाला. या आल्हाददायक वातावरणामुळे चारधाम यात्रेसाठी आलेल्या भाविकांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले आहे.

हवामानातील या बदलामुळे उत्तराखंडच्या पर्वतीय भागात हिवाळ्यासारखे वातावरण निर्माण झाले आहे. सोमवारी यमुनोत्री धाममध्ये पावसाच्या सरींसोबतच बर्फाचे पांढरेशुभ्र पुंजके पडू लागले. मे महिन्यात अशाप्रकारे हिमवर्षाव होणे ही एक दुर्मीळ घटना मानली जात आहे. यमुनोत्रीसोबतच गंगोत्री धामच्या शेजारील पर्वतशिखरांवरही मोठ्या प्रमाणात बर्फवृष्टी झाली आहे. स्थानिक तीर्थपुरोहित गौरव उनियाल यांनी सांगितले की, यमुनोत्री उंचावर असल्याने पाऊस आणि थंडी सामान्य असली, तरी मे महिन्यात होणारा हा हिमवर्षाव खरोखरच आश्चर्यकारक आहे.

# संतोष देशमुख हत्या प्रकरण! आरोपपत्र रद्द करण्याची वाल्मिक कराडची मागणी

■ बीड

मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणातील आरोपींनी आता उच्च न्यायालयाचे दरवाजे ठोठावले. या प्रकरणातील आरोपी वाल्मिक कराड आणि विष्णू चाटे यांनी बीडच्या विशेष मकोका न्यायालयाने निश्चित केलेले आरोपपत्र रद्द करण्यात यावे, या मागणीसाठी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली. या याचिकेवर काय निर्णय होतो, याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे. या प्रकरणातील पुढील सुनावणी २१ मे रोजी होणार आहे. आरोपी जयराम चाटेने बीडच्या विशेष न्यायालयात जामिनासाठी अर्ज दाखल केला. तर प्रतीक घुले याने कारागृहातूनच न्यायालयाकडे अर्ज सादर केला असून, त्या अर्जाचा नेमका उद्देश अद्याप स्पष्ट झालेला नाही. सुनावणीत आरोपींच्या वकिलांनी काही मागण्या न्यायालयासमोर मांडल्या. पंचनाम्याच्या चित्रफिती न्यायालयात दाखवाव्यात, अशी मागणी करण्यात आली. तसेच पुरावा म्हणून जप्त करण्यात आलेल्या संगणकाची प्रत द्यावी. अशी मागणीही पुन्हा करण्यात आली.

# पालघरसाठी ८४ हजार लिटर केरोसीनचा साठा मंजूर

■ पालघर

**गॅस** टंचाईच्या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने पालघर जिल्ह्यासाठी ८४ हजार लिटर केरोसीनचा साठा मंजूर केला आहे. एका कुटुंबाला ३ लिटर केरोसीन दिले जाणार आहे.

युद्धाच्या पार्श्वभूमीवर सध्या गॅसचा तुटवडा निर्माण झाला. ग्रामीण भागात सिलिंडर मिळण्याकरिता ४५ दिवसाचा तर शहरी भागात २५ दिवसांचा कालावधी ठरवून देण्यात आलेला आहे. या गॅस टंचाईमुळे नागरिक त्रस्त झाले. त्यावर उपाय म्हणून केंद्र सरकारने केरोसीन वितरित करण्याचा निर्णय घेतला आहे. पालघर जिल्ह्याने १ लाख ३२ हजार लिटर केरोसीनची मागणी केली होती.


## पश्चिम रेल्वे

वरिष्ठ विभागीय व्यावसायिक व्यवस्थापक, मुंबई मध्य विभाग, पश्चिम रेल्वे विभागीय रेल्वे व्यवस्थापक, व्यावसायिक विभाग, एनएफआर विभाग, मुंबई मध्य - मुंबई - ४०० ००८.

**काम - मुंबई विभागातील विविध एनएफआर माध्यमांद्वारे जाहिरातींचे प्रदर्शन.**

| लिलाव कॅटलॉग क्र. | | लिलाव प्रारंभ (सर्व लॉट) | | |
|---|---|---|---|---|
| एमएमसीटी-एडीव्हीटी-२६-७ | | २८.०५.२६ रोजी १५:००:०० | | |
| अ. क्र. | लॉट क्र. | ठिकाण / क्षेत्र | दिवस | ई-लिलाव समाप्तीची तारीख आणि वेळ |
| १ | डीव्हीटी-बीसीटी-बीए-ओएच-४७७-२६-१ (जाहिरात - घराबाहेर) | बीएआरओबी, वांद्रे स्टेशन (पूर्व) येथील विद्यमान होर्डिंग रचनेवर (ज्यामध्ये दुरुस्ती/सक्षमीकरण इत्यादींचा समावेश आहे) जाहिरात प्रदर्शित करण्याचे धाऊक अधिकार, यामध्ये पश्चिमाभिमुख, ४०' x ४०' (१) आकाराच्या जाहिरातीचा समावेश असून, त्याचे एकूण क्षेत्रफळ १६०० चौ.फूट इतके आहे. | १०९६ | २८.०५.२६ १५:३०:०० |

संपर्क तपशील:- लँडलाईन क्र.:- ०२२६७६४४२१२, ईमेल आयडी:-acmadvtgbct@gmail.com
टीप: संभाव्य बोलीदारांना आयआरईपीएस वेबसाईट (www.ireps.gov.in) वरील ई-लिलाव लीजिंग मॉड्यूलला भेट देण्याची विनंती केली जाते. लॉटनिहाय तपशील तेथे नमूद केलेल्या कॅटलॉग अंतर्गत उपलब्ध आहेत. 0083

Like us on: facebook.com/WesternRly • Follow us on twitter.com/WesternRly

संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

॥ न मे भक्त प्रणश्यति ॥

# प्रकांड पंडित महामहोपाध्याय डॉ. काणे

**आज** विख्यात कायदेपंडित आणि धर्मशास्त्राचे अभ्यासक महामहोपाध्याय डॉ.पांडुरंग वामन काणे यांचा जन्मदिन. कोकणातील वेदशास्त्रपारंगत अशा मध्यमवर्गीय कुटुंबात काणे यांचा जन्म झाला. अतिशय मेहनतीने स्कॉलरशिप मिळवत आणि एकीकडे शिकवत राहून त्यांनी खूप विद्या संपादन केली. संस्कृत भाषेवर अतिशय प्रेम होते. १९०४ साली रत्नागिरी जिल्ह्यातील शाळेत शिक्षक म्हणून कामास काणेंनी सुरुवात केली. नंतर ते एल्फिन्स्टन हायस्कूल, मुंबई येथे नोकरीवर होते. महामहोपाध्याय डॉ. पांडुरंग वामन काणे यांनी विल्सन कॉलेज, मुंबई येथून त्यामुळे बी.ए.ला संस्कृतमध्ये सर्वप्रथम, मग एलएल.बी., झाला. वेदान्त पारितोषिकासह एम.ए. आणि 'हिंदू-मुसलमान कायदा' घेऊन एलएल.एम. केले. त्यांना मराठी, हिंदी खेरीज संस्कृत, जर्मन, फ्रेंच इ. भाषा अवगत होत्या. नंतर ते मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू झाले. जन्मजात बुद्धीमत्ता व तिला अथक परिश्रमांची जोड यांच्या जोरावर काणेंनी कायद्याबरोबरच भारतीय तत्त्वज्ञान व धर्मशास्त्र यावरही प्रभुत्व मिळवले. त्यांनी अनेक ग्रंथांची निर्मिती केली. प्राचीन संस्कृत वाङ्मयाचा अभ्यास, सामाजिक अभिसरणाचे भान या दोन अगदी वेगळ्या वाटणाऱ्या गोष्टींमधून काण्यांनी 'धर्मशास्त्राचा पंचखंडात्मक इतिहास' नावाचा ग्रंथ सिद्ध केला.

हा ग्रंथ भारतीय धर्मशास्त्र, सामाजिक नियम, परंपरा, न्यायव्यवस्था आणि धार्मिक आचार यांचा विश्वकोष मानला जातो. पाच खंडांमध्ये प्रसिध्द झालेला हा ग्रंथ ६ हजार ५०० पानांचा आहे.हा ग्रंथ लिहिण्यास त्यांना जवळपास ३० हून अधिक वर्षे लागली. या ग्रंथात त्यांनी वेद, स्मृती, महाभारत, पुराणे, प्राचीन भारतीय कायदे आणि सामाजिक प्रथा यांचा सखोल अभ्यास करून माहिती दिली आहे. त्यांचे प्राचीन भाषा, वाङ्मय, काव्य महाकाव्य, अलंकारशास्त्र यांचे प्रेम आणि कायदेविषयक जाण, तार्किक मांडणी, प्रथा आणि परंपरांचा कालानुरूप अर्थ लावण्याची क्षमता या आणि अशा शेकडो पैलूंचे एक विस्मयकारी मिश्रण पांडुरंग शास्त्रींच्या लेखनात झाले. काणे यांनी फारसे सुभाषित स्वरुपातील विचार प्रसिध्द केले नाहीत. त्यांच्या लेखनातून आणि भाषणांमधून काही महत्त्वाचे विचार स्पष्टपणे दिसून येतात. त्यांचे विचार मुख्यतः भारतीय संस्कृती, धर्म, संशोधन आणि सामाजिक सुधारणांभोवती फिरत होते.डॉ. काणे यांचे असे आग्रही मत होते की, धर्म हा फक्त पूजा-पाठ किंवा धार्मिक विधींपुरता मर्यादित नसतो. तो समाजव्यवस्था, नैतिकता आणि मानव कर्तव्य यांच्याशी जोडलेला असतो. धर्म समाजाच्या कल्याणासाठी असतो, तो काळानुसार समजून घेतला पाहिजे, असे ते नेहमी सांगत. त्यांनी अंधश्रध्देपेक्षा संशोधनाला अधिक महत्त्व दिले. प्राचीन परंपरेचा अभ्यास श्रद्धेनेच नव्हे तर चिकित्सक बुद्धीनेही झाला पाहिजे, असा त्यांचा दृष्टिकोन होता. त्यांच्या आयुष्याचा मोठा भाग अभ्यास आणि लेखनात गेला. ज्ञानामुळेच समाज प्रगत होतो, असे ते नेहमी मानत. भारतीय संस्कृती काळानुसार बदलत गेली आहे, असे त्यांनी आपल्या संशोधनातून दाखवून दिले. भारतीय संस्कृती स्थिर नाही, ती काळानुसार विकसित होत राहते, असा संदेश त्यांना संशोधनाच्या आधारे दिला. त्यांनी हजारो संदर्भ तपासून लेखन केले.

काणे पहाटे चार-पाच वाजल्यापासून अभ्यासाला बसत असत. त्यांच्या धर्मशास्त्राच्या इतिहासाच्या पाच खंडांच्या लिखाणासाठी त्यांनी हजारो ग्रंथांचा संदर्भ घेतला. एका मुलाखतीत त्यांनी सांगितले होते की, त्यांनी आपल्या आयुष्यात कधीही शनिवार-रविवारची सुट्टी घेतली नाही आणि प्रवासातही वाचन सुरू असे.

काणे हे मुंबई उच्च न्यायालयात वकिली करत होते. एकदा कोर्टात हिंदू कायद्याशी संबंधित एका गुंतागुंतीच्या केसवर सुनावणी सुरू होती. त्यावेळी एका वरिष्ठ वकिलाने एक संस्कृत श्लोक चुकीचा उद्धृत केला. तेव्हा कनिष्ठाच्या भूमिकेत असलेल्या काणेंनी उठून, तो श्लोक मूळ ग्रंथात कसा आहे आणि त्याचा खरा अर्थ काय, हे स्पष्ट केले. त्यांची ती अचूकता आणि सखोल व्यासंग पाहून उपस्थित न्यायाधीश थक्क झाले होते.

त्यांचे हे प्रचंड पांडित्य, हा साक्षेपी व्यासंग ही तैलबुद्धी आणि सखोल संशोधनाची आस पुढील कित्येक पिढ्यांपर्यंत झिरपली गेली. पां.वा. काणे यांना १९४६ साली अलाहाबाद विद्यापीठाने सन्माननीय डॉक्टरेट बहाल केली. त्यांनी धर्मशास्त्राचा इतिहास मराठीत लिहून काढला. या कामाबद्दल त्यांना १९५२ साली नॅशनल प्रोफेसर हा पुरस्कार देण्यात आला. काणे राज्यसभेचे खासदार होते. भारत सरकारने काणे यांना १९६३ साली भारतरत्न हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. त्यांचे चिरंजीव डॉ. प्रभाकर पांडुरंग काणे हे रॉचेस्टर विद्यापीठाचे पीएच.डी. आहेत. ते आयआयटीमध्ये प्राध्यापक होते. दुसरे चिरंजीव डॉ. गोविंद पांडुरंग हे रसायनशास्त्र घेऊन एम.एस्सी झाले. मग केमिकल टेक्नॉलॉजी आणि केमिकल इंजिनिअरिंगकडे वळले. त्यांना लंडनच्या इंपीरियल कॉलेजमधून इंधन वायूच्या ज्वलनाच्या अभ्यासासाठी पीएच.डी मिळाली आहे. डॉ. गोविंद पांडुरंग काणे हे मुंबई विद्यापीठात प्रपाठक, प्राध्यापक होते आणि नंतर माटुंग्याच्या यू.डी.सी.टी.मधे डायरेक्टर झाले. त्यांनी अनेक विद्यार्थी घडवले. गोविंद पांडुरंग काणे हे दिल्लीच्या उद्योग मंत्रालयाचे वैज्ञानिक सल्लागार होते. त्यांना पद्मश्री देण्यात आली होती. डॉ.पांडुरंग वामन काणे यांचे १८ एप्रिल १९७२ रोजी निधन झाले.

## सुविचार

**विलास कोळेकर**
खंडाळा, रत्नागिरी. मोबा.९४२२४२०६११


चांगले करूनही काही लोकं तुम्हाला वाईट समजत असतील तर तो तुमचा दोष नाही. कदाचित तुम्हाला ओळखण्याइतपत त्यांची पात्रता नसेल.

## पंचांग

**शुक्रवार, ८ मे २०२६**
**शक १९४८ पराभवनामसंवत्सर**

* वैशाख कृष्ण षष्ठी
* नक्षत्र : उत्तराषाढा

रवी उदय- ०६-०८
रवी अस्त- १९-०२



-: जन्मराशी :-
००-०१ ते ०१-२५ धनु
०१-२६ ते २४-०० मकर

**रविंद्रनाथ टागोर जन्मदिन, जागतिक रेडक्रॉस दिन**

मुद्रक, प्रकाशक **सौ. जयश्री रमाकांत खाडिलकर-पांडे** यांनी हे दैनिक नवाकाळ ऑफीस आणि नवाकाळ प्रेस करिता दांगट मीडिया प्रा.लि., पत्ताः प्लॉट नं. २२, दिघा एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रीयल एरीया, विष्णू नगर, दिघा, नवी मुंबई -४००७०८ येथे छापून घेतले व नवाकाळ बिल्डिंग, १३ नवाकाळ पथ, खाडीलकर रोड, गिरगांव, मुंबई -४००००४ येथे प्रसिद्ध केले.
संपादक : **रोहित रमाकांत पांडे** • कार्यकारी संपादकः **समीर करंबे** (*पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी कार्यकारी संपादक यांच्यावर आहे.)

संपर्क : संपादक विभागः ८६५२२०१४४०,
जाहिरात विभाग : ८१०८११६४२३, ८१०८११६४२९,
छोट्या जाहिरातीः ८४२२८१७४४५. वितरण विभाग : ९५९४९३६४४१
ई-मेलः contact@navakal.in
'नवाकाळ ऑफिस व नवाकाळ प्रेस'चे प्रकाशन दैनिक
'नवाकाळ' आर.एन.आय.क्र.१८१४/५७
स्थापना ७ मार्च १९२३/ फाल्गुन वद्य ५ शके १८४४

Printed and Published by **Jayshree Ramakant Khadilkar-Pande** On behalf of Navakal Office And Navakal Press. Printed at Dangat Media Pvt. Ltd., Address : Plot No.22, Digha M.I.D.C., TTC Industrial Area, Vishnu Nagar, Digha, Navi Mumbai - 400 708. Published at Navakal Building, 13 Navakal Path, Khadilkar Road, Girgaum, Mumbai - 400 004.
Editor - **Rohit Ramakant Pande** • Executive Editor - **Sameer Karambe** (*As per P.R.B. law Executive Editor will be responsible for all the content in Daily Navakal)

## पाककृती



### मेथीचे आंबट-गोड वरण

★**साहित्य** :- १ कप बारीक चिरलेली ताजी मेथीची पाने
१ कप तुरडाळ/वाटाणे
डाळ प्रेशर कुकरमध्ये शिजवण्यासाठी १.५ कप पाणी + भिजवण्यासाठी वगैरे पाणी, १/२ चमचा हळद पावडर, २ लांब हिरव्या मिरच्या, लसणाच्या ९ पाकळ्या, १ मोठा चमचा जाडसर चिरलेले आले, १/२ चमचा जिरे, १/२ चमचा मोहरी, चिमूटभर हिंग
१ टेबलस्पून चिंचेचा लगदा
२ चमचे गोडा मसाला, १ टेबलस्पून ताडगूळ, १ टेबलस्पून तेल, चवीनुसार मीठ, अंतिम सौम्यीकरणासाठी १ चमचा तूप, १/४ चमचा मोहरी, १/४ चमचा जिरे, २-३ अख्ख्या लाल मिरच्या

★**साहित्य** :- तूरडाळ धुवून २० मिनिटे भिजत ठेवा. आंबट गोडा वरणसाठी भिजलेली तूरडाळ पाणी काढून टाका आणि त्यात १.५ कप पाणी, हळद घालून मऊ आणि लगदा होईपर्यंत



प्रेशर कुकरमध्ये शिजवा. प्रेशर कुकरमध्ये शिजवलेली तूरडाळ आणि हळद पावडर, डाळ चांगली फेटून बाजूला ठेवा. आंबट गोड वरणाला मुलायम पोत येण्यासाठी तूरडाळ फेटून घ्या. हिरव्या मिरच्या, लसूण आणि आले यांची जाडसर पेस्ट बनवा. एका पॅनमध्ये गरम करा. त्यात १ टेबलस्पून तेल आणि मोहरी घाला. मोहरी तडतडल्यावर त्यात जिरे घाला. हिरवी मिरची, लसूण आणि आल्याची पेस्ट घालून, कच्चा वास जाईपर्यंत चांगले परतून घ्या. आता बारीक चिरलेली मेथीची पाने घाला. मेथी चांगली परतून घ्या आणि त्यातील सर्व ओलावा निघून जाईपर्यंत वाफवून घ्या.

## क्रीडा

# लखनौचा बंगळुरुवर ९ धावांनी विजय



**मिचेल मार्शच्या धडाकेबाज शतकी खेळी आणि प्रिंस यादवच्या प्रभावी गोलंदाजीमुळे लखनौ सुपर जायंट्सने रॉयल चॅलेंजर्स बंगळुरुवर ९ धावांनी विजय मिळवला. बंगळुरुचा आयपीएलच्या या हंगामातील चौथा पराभव आहे. लखनौमध्ये झालेल्या आयपीएलच्या ५० व्या सामन्यात पावसामुळे दोनवेळा खेळ थांबवला. मग पंचांनी हा सामना १९ षटकांचा खेळवण्याचा निर्णय घेतला. प्रथम फलंदाजी करणाऱ्या लखनौने ३ बाद २०९ धावा केल्या. डकवर्थ लुईसनुसार बंगळुरुला विजयासाठी २१३ धावांचे आव्हान मिळाले. या प्रत्युत्तरात बंगळुरुने ६ बाद २०३ धावा केल्यामुळे लखनौने तिसरा विजय नोंदवला.**

■ लखनौ

**बंगळुरुने** नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करण्याचा निर्णय घेतला. लखनौचा सलामीवीर फलंदाज मिचेल मार्शने चौफेर फटकेबाजी सुरू केली. त्याला अर्शीन कुलकर्णीनेही साथ दिली. मात्र पाऊस आल्याने काही मिनिटे खेळ थांबण्यात आला. पहिल्या विकेटसाठी ९.१ षटकांत ९५ धावांची भागिदारी झाली असता कुलकर्णी २४ चेंडूंत १७ धावा करून बाद झाला. त्याला कृणाल पंड्याने माघारी धाडले. मिचेल मार्शने निकोलस पूरनच्या साथीत आपला आक्रमक खेळ सुरुच ठेवला आणि मार्शने ४९ चेंडूंत शतक पूर्ण केले. पुन्हा पावसाने हजेरी लावल्यामुळे दुसऱ्यांदा खेळ थांबला. परिणामी सामना १९ षटकांचा खेळवण्याचा निर्णय झाला. या जोडीने संघाची धावसंख्या १६.१ षटकांत १ बाद १६५ वर पोहोचवली. मग जोश हॅझलवुडने मिचेल मार्शला तंबूत धाडले. मार्शने ५६ चेंडूंत १११ धावा केल्या. निकोलस पूरन २३ चेंडूंत ३८ धावा करून झेलबाद झाला. शेवटी ऋषभ पंत आणि एडन मार्कराम अनुक्रमे १० चेंडूंत ३२ आणि १ चेंडूंत १ धावेवर नाबाद राहिले. त्यामुळे लखनौला ३ बाद २०९ धावांपर्यंत पोहोचता आले.

डकवर्थ लुईसनुसार बंगळुरुला २१३ धावांचे लक्ष्य देण्यात आले. या धावसंख्येचा पाठलाग करताना बंगळुरुची सुरुवात खराब झाली. सलामीवीर जेकब बेथेलला ४ धावांवर मोहम्मद शमीने बाद केले. खाते उघडण्यापूर्वी विराट कोहलीचा प्रिंस यादवने त्रिफळा उडवला. त्यामुळे बंगळुरुची अवस्था १.२ षटकांत २ बाद ९ धावा अशी झाली होती. देवदत्त पडिक्कल आणि कर्णधार रजत पाटीदार या जोडीने संघाचा मोर्चा सांभाळून आक्रमक फलंदाजी सुरू केली. पाटीदारने २३ चेंडूंत अर्धशतक पूर्ण केले. ही जोडी प्रिंस यादवने फोडली. पडिक्कल २५ चेंडूंत ३४ धावा करून माघारी परतला. त्यापाठोपाठ प्रिंस यादवने जितेश शर्माला १ धावांवर तंबूत धाडले. रजत पाटीदार ३१ चेंडूंत ६ षटकार आणि ३ चौकारांसह ६१ धावा करून झेलबाद झाला. परिणामी बंगळुरुची स्थिती ११.३ षटकांत ५ बाद ११२ धावा अशी झाली. अखेरच्या षटकांमध्ये टिम डेव्हिड एकामागून एक चौकार आणि षटकार ठोकून १७ चेंडूंत ४० धावा करून माघारी परतला. त्यानंतर रोमारियो शेफर्डच्या साथीत कृणाल पंड्याने आक्रमक फलंदाजी केली तरी देखील बंगळुरु विजयापासून ९ धावांनी दूर राहिला.

## वानखेडेवर १ जूनपासून टी-२० मुंबई लीग महिलांची पहिली लीग देखील होणार

■ मुंबई

**टी-२०** मुंबई लीगचा चौथा हंगाम आणि टी-२० मुंबई महिला लीगचा पहिला हंगाम १ ते १३ जून दरम्यान मुंबईच्या वानखेडे स्टेडियमवर आयोजित केला जाईल. त्यामुळे शहरात एका ऐतिहासिक क्रिकेट महोत्सवाची सुरुवात होईल, अशी घोषणा मुंबई क्रिकेट असोसिएशनने केली.

पुरुषांच्या स्पर्धेत जगातील काही मोठ्या क्रिकेटपटूंसोबतच शहरातील सर्वात आश्वासक उदयोन्मुख खेळाडूही एकत्र येतील, ज्यात सूर्यकुमार यादव, श्रेयस अय्यर, अजिंक्य रहाणे, यशस्वी जैस्वाल, शिवम दुबे, सरफराज खान, शार्दुल ठाकूर, तुषार देशपांडे, आयुष म्हात्रे, अंगक्रिश रघुवंशी, मुशीर खान, सूर्यांश शेडगे आणि अभिज्ञान कुंडू यांचा समावेश आहे. पहिल्या महिला लीगमध्येही काही आघाडीच्या नावांसोबतच देशांतर्गत क्रिकेटमधील सर्वात तेजस्वी युवा खेळाडूंचा समावेश असेल, ज्यात सायली सातघरे, सायमा ठाकोर, हुमैरा काझी, लिलावात सर्वात महागडी खेळाडू ठरलेली इरा जाधव, सानिका चाळके आणि सिमरन शेख यांचा समावेश आहे. सर्व सामने स्टार स्पोर्ट्सवर थेट प्रक्षेपित केले जातील.

## पंजाबचा माजी क्रिकेटपटू अमनप्रीत सिंग याचे निधन

■ चंदीगड

**पंजाबचा** माजी क्रिकेटपटू अमनप्रीत सिंग गिल याचे दीर्घ आजारामुळे वयाच्या ३६ व्या वर्षी निधन झाले. त्याने भारतातील अनेक महान क्रिकेटपटूंसोबत ड्रेसिंग रूम शेअर केली होती.

त्याने २००७ मध्ये भारतीय १९ वर्षांखालील संघाकडून खेळताना विराट कोहलीसारख्या अनेक खेळाडूंसोबत ड्रेसिंग रूम शेअर केली होती. त्याने भारतासाठी ५ युवा एकदिवसीय आणि १ युवा कसोटी सामना खेळला. कसोटीमध्ये त्याने श्रीलंकेचा माजी अष्टपैलू खेळाडू थिसारा परेराची विकेटही घेतली होती. आपल्या कारकिर्दीत पंजाबसाठी ६ प्रथम श्रेणी सामने खेळले.

## युनियन क्रिकेट अकॅडमी संघाची आगेकूच कायम

■ ठाणे

**शाश्वत** अत्तरडेची अचूक टप्प्यावरची गोलंदाजी, शाश्वत जगताप, दिव्यांश सक्सेना आणि रोहन करंदीकरच्या जबाबदारीपूर्ण फलंदाजीच्या जोरावर युनियन क्रिकेट अकॅडमीने एटी स्पोर्ट्सचा ६ फलंदाज राखून पराभव करत महाराष्ट्र माझा सेवा संस्थेने युनियन क्रिकेट क्लबच्या सहकार्याने आयोजित १४ व्या ठाणे प्रीमियर लीगमध्ये उपांत्य फेरीत स्थान मिळवले. एटी स्पोर्ट्सच्या १७२ धावांच्या आव्हानाला सामोरे जाताना युनियन क्रिकेट अकॅडमी संघाने ४ फलंदाजांच्या मोबदल्यात १७३ धावांसह सामन्यात वर्चस्व गाजवले.

प्रथम फलंदाजी करताना शिवम घोष, अश्विन यादव आणि रवी चौधरीने छोट्या पण संघासाठी उपयुक्त खेळी केल्याने एटी स्पोर्ट्सला समाधानकारक धावसंख्या उभारता आली. अश्विनने २९, शिवमने २६, गौतमने २३ आणि रवीने २२ धावांचे योगदान दिले. या डावात शशांक अत्तरडेने फलंदाजांना जखडून ठेवताना २५ धावांत ४ बळी मिळवले. मित समानीने २ फलंदाज बाद केले. या आव्हानाला सामोरे जाताना शाश्वत जगताप, दिव्यांश सक्सेना आणि रोहन करंदीकरने खेळपट्टीवर उभे राहून संघाला विजयाचा दरवाजा उघडून दिला.

**जाहीर सूचना**

तमाम जनतेस याद्वारे सूचना देण्यात येते की, माझे अशील **श्री. आदित्य सतिश पुरी** हे गाव चेंबूर तालुका कुर्लाचा सी.टी.एस. क्र. १४४७, १४४७/१, १४४७/२ धारण केलेल्या जमिनीवर उभ्या; पुरी निकेतन अपार्टमेन्ट्स, १२ वा रस्ता, भूखंड क्र. ५२९, उपनगर योजना क्र. III, सेंट्रल अ‍ॅव्हेन्यू रोड, कॉसमॉस बँक जवळ, चेंबूर, मुंबई ४०००७१ या इमारतीच्या ३ ऱ्या मजल्यावरील निवासी **अपार्टमेन्ट क्र. ३०१**, मोजमाप ८१६ चौरस फूट कार्पेट क्षेत्रफळ आणि निवासी **अपार्टमेन्ट क्र. ३०२**, मोजमाप ८३० चौरस फूट कार्पेट क्षेत्रफळ चे संपूर्ण मालक आणि ताबेदार आणि/किंवा अन्यथा योग्य आणि पुरेसे हक्कदार असलेल्या **सौ. संगीता रमेश मल्होत्रा** यांच्याकडून खरेदी करण्यास प्रस्तावित आहेत.
त्या सदर अपार्टमेन्ट आणि कार पार्किंग **जागा क्र. ९** च्या संदर्भातील सर्व हक्क, शीर्षक, हितसंबंध, हिस्सा, दावे, लाभ, इ.च्या हक्कदार आहेत.
कोणा व्यक्तीचा सदर अपार्टमेन्ट आणि तिच्या कोणत्याही भागाविरुद्ध, मध्ये किंवा वर विक्री, देवाणघेवाण, वारसा, करारपत्र, कंत्राट, गहाणवट, वहिवाट, भेट, भाडेपट्टी, भाडेकरू, धारणाधिकार, प्रभार, न्यास, निवासाचा हक्क, देखभाल किंवा गहाळ दस्तऐवजांच्या आधारे या मार्गे किंवा अन्यथा कशाही प्रकारे कोणताही दावा असल्यास त्याबाबत निम्नस्वाक्षरीकार यांना सहाय्यक कागदोपत्री पुराव्यासह, येथील दिनांकापासून १५ दिवसांच्या आत लेखी स्वरुपात सूचित करावे, असे न केल्यास दावा आणि/किंवा आक्षेप, जर असल्यास, सोडून दिला आणि/किंवा त्याग केला असे समजण्यात येईल आणि माझे अशील अशा दाव्याच्या कोणत्याही संदर्भाशिवाय विक्री व्यवहार पूर्ण करतील आणि तो, जर असल्यास, सोडून दिला असे समजण्यात येईल.

**मालमत्तेचे वर्णनः**
मुंबई उपनगरच्या नोंदणीकरण जिल्हा आणि उप-जिल्ह्यामधील गाव चेंबूर तालुका कुर्लाचा सी.टी.एस. क्र. १४४७, १४४७/१, १४४७/२ धारण केलेल्या जमिनीवर उभ्या; **पुरी निकेतन अपार्टमेन्ट्स**, १२ वा रस्ता, भूखंड क्र. ५२९, उपनगर योजना क्र. III, सेंट्रल अ‍ॅव्हेन्यू रोड, कॉसमॉस बँक जवळ, चेंबूर, मुंबई ४०००७१ या इमारतीच्या ३ ऱ्या मजल्यावरील निवासी **अपार्टमेन्ट क्र. ३०१**, मोजमाप ८१६ चौरस फूट कार्पेट क्षेत्रफळ आणि निवासी **अपार्टमेन्ट क्र. ३०२**, मोजमाप ८३० चौरस फूट कार्पेट क्षेत्रफळ चे सर्व खंड आणि तुकडे.

**दिनांकः** ०८ मे, २०२६ सही/-
**ठिकाणः** मुंबई **ॲड. अजीत सिंग हिंदुजा**
**ॲडव्होकेट उच्च न्यायालय**
न्यायमूर्ती गिरीश कुलकर्णी आणि न्यायमूर्ती आरती साठे यांच्या खंडपीठाने हा निर्णय दिला. या खटल्यातील याचिकाकर्ते राजेंद्र पॉल भारद्वाज हे ओएनजीसीमध्ये व्यवस्थापक म्हणून कार्यरत होते. त्यांनी त्यांच्यावर झालेल्या विभागीय कारवाईला आव्हान दिले होते. विभागीय कारवाईमुळे त्यांची तब्बल १० वर्षांनंतर 'पदावनती' करण्यात आली होती. यावर भारद्वाज यांनी न्यायालयात धाव घेतली होती. त्याची गंभीर दखल घेत न्यायालयाने त्यांच्यावरील कारवाई रद्द केली आणि त्यांना सर्व सेवा लाभ, वरीष्ठता आणि थकित वेतन देण्याचे आदेश ओएनजीसीला दिले. तब्बल १० वर्षांनंतर कारवाई सुरू करणे हे योग्य नसल्याचे निरीक्षण न्यायालयाने आपल्या निकालात नोंदविले आहे.

# दहावीत मुलाला ५०० पैकी ४९९ गुण
## मातेला १ गुण कमी मिळाल्याचे दुःख

■ सिलिगुडी

**आजच्या** अतिस्पर्धेच्या युगात आपल्या पाल्याला परीक्षेत पैकीच्या पैकी गुण मिळावेत असा काही पालकांचा अट्टाहास असतो. पाल्याने एक गुण जरी कमी मिळवला तरी असे पालक प्रचंड नाराज होतात. असाच एक प्रकार सध्या इंटरनेटवर चर्चेचा विषय ठरला आहे. आयसीएसई बोर्डाच्या दहावीच्या परीक्षेत एका मुलाला ५०० पैकी ४९९ गुण मिळाले. तर त्याच्या आईला याचा आनंद न वाटता दुःख झाले. आणखी थोडे प्रयत्न केले असते तर एक गुण कमी मिळाला नसता, अशा शब्दात तिने सोशल मीडियावर प्रतिक्रिया दिली.

दिव्येंदू प्रामाणिक असे या मुलाचे नाव असून तो सिलिगुडीतील ऑक्झिलियन कॉन्व्हेंट शाळेत शिकतो. दिव्येंदूच्या आईने व्यक्त केलेली खंत ही सध्या सोशल मीडियावर चांगलीच चर्चेचा विषय ठरली आहे.

# कार्यालयाच्या जागेचे जादा भाडे
## शिवशाहीचा म्हाडावर आक्षेप

■ मुंबई

**वांद्र्यातील** म्हाडा भवनात शिवशाही पुनर्वसन प्रकल्पाचे भाडेपट्टीवर कार्यालय आहे. या कार्यालयाचे जागेचे भाडे जादा दराने आकारले जात आहे. असा आक्षेप शिवशाहीने म्हाडावर घेतला आहे.

म्हाडा भवनाच्या पाचव्या मजल्यावर ७८६३ चौरस फुटाच्या जागेत गेले पंचवीस वर्षांपासून शिवशाही पुनर्वसन प्रकल्पाचे भाडेतत्त्वावर कार्यालय आहे. म्हाडा आमच्याकडून दरमहा २६५ रुपये चौरस फुटानुसार भाडे घेते. या भाडेपट्टी आकारणीचा शिवशाही कार्यालयाने अभ्यास केला असता शासनाच्या गृहनिर्माण दिनांक ३/९/२००३ परिपत्रक सन २००२/प्र.क्र.३१६ नुसार शासकीय उपक्रम असलेल्या शिवशाही पुनर्वसन प्रकल्पाकडून म्हाडाने २६५ रुपयांऐवजी १५ रुपये चौरस फुटाच्या दराने जागेचे भाडे आकारणे क्रमप्राप्त आहे. पण म्हाडा आतापर्यंत २६५ रुपये चौरस फुटाच्या दराने दरमहा लाखो रुपयांचे भाडे आकारत आली आहे. आता हे भाडे १५ रुपयांनी घेतले जावे अशी मागणी शिवशाहीने केली आहे. त्यामुळे म्हाडाच्या निर्णयाकडे लक्ष लागून राहिले आहे.

# वीज ग्राहकांना लोक अदालतीतून
## प्रलंबित प्रकरणांचा निपटारा होणार

■ कल्याण

**महावितरणच्या** कल्याण परिमंडलातील कायमस्वरूपी वीजपुरवठा खंडित प्रकरणे तसेच वीजबिलाबाबत वाद आणि वीज चोरीच्या दाखलपूर्व व प्रलंबित प्रकरणांचा तडजोडीने निपटारा करण्याची संधी आहे. संबंधित ग्राहकांनी तालुका न्यायालय स्तरावर ९ मे रोजी आयोजित लोक अदालतीत सहभागी होऊन आपापली प्रकरणे सामोपचाराने निकाली काढावीत, असे आवाहन महावितरणने केले आहे.




कल्याण परिमंडल कार्यक्षेत्रातील ठाणे, पालघर जिल्ह्यातील सर्व तालुका न्यायालयात ९ मे रोजी सकाळी राष्ट्रीय लोक अदालत आयोजित करण्यात आली आहे. ठाणे आणि पालघर जिल्ह्यातील कल्याण मंडळ-२ कार्यालय अंतर्गत १,६१,४३९ वीज ग्राहकांकडे १३४ कोटी रुपये, वसई मंडळ कार्यालय अंतर्गत १,०१,०९१ वीज ग्राहकांकडे ११२ कोटी रुपये तर पालघर मंडळ कार्यालय अंतर्गत १८,५८६ वीज ग्राहकांकडे १९ कोटी रुपयांची अशी एकूण २६६ कोटी रुपयांची थकबाकी आहे.

# पनवेलच्या वडाळे तलावाला
## जलपर्णीच्या विळख्यातून मुक्ती

■ पनवेल




**पनवेल** शहराचे भूषण आणि ऐतिहासिक वारसा असलेल्या वडाळे तलावाच्या संवर्धनासाठी पनवेल महानगरपालिकेने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे.

या 'जैविक नियंत्रण' मोहिमेंतर्गत अत्यंत कमी खर्चात 'साल्व्हिनिया विविल' हे भुंग्याच्या प्रजातीतील किडे वडाळे तलावातील जलपर्णी नष्ट करतील व वडाळा तलाव पूर्ववत सुंदर होणार असल्याचे महापौर नितीन पाटील यांनी सांगितले. वडाळे तलावात वाढलेल्या 'साल्व्हिनिया मोलेस्टा' या आक्रमक जलपर्णीच्या निर्मूलनासाठी 'जैविक नियंत्रण' मोहिमेचा शुभारंभ आज महापौर यांच्या हस्ते तलावात 'साल्व्हिनिया विविल' या जैविक कीटकांचे विसर्जन करून करण्यात आला यावेळी ते बोलत होते.

# नाशिकमध्ये शेतकरी महिलांना मारहाण
## राऊतांनी जिल्हाधिकाऱ्यांना जाब विचारला


■ नाशिक

**कुंभमेळ्यासाठी** नाशिक शहरातील प्रस्तावित रिंगरोड प्रकल्पाच्या भूसंपादनावेळी शेतकरी महिलांना घरात घुसून मारहाण करण्यात आल्याचा आरोप होत असून, या घटनेवरून राजकीय वातावरण तापले आहे. पीडित महिलांसह खासदार संजय राऊत यांनी जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक देत संबंधित प्रांताधिकाऱ्यांवर कारवाईची मागणी केली.

नाशिक शहरातील सुमारे ६६ किलोमीटरच्या प्रस्तावित रिंगरोडसाठी भूसंपादन प्रक्रिया सुरू आहे. मातोरी आणि मुंगसरे येथे मोजणीदरम्यान काही शेतकऱ्यांनी जमिनी देण्यास विरोध दर्शवला. स्थानिक ग्रामस्थांच्या आरोपानुसार, प्रांताधिकारी पवन दत्ता यांच्या उपस्थितीत पोलिसांनी घरात घुसून महिलांना मारहाण केली आणि त्यांना जबरदस्तीने बाहेर काढले. या घटनेच्या काही चित्रफिती समोर आल्यानंतर संतापाची लाट उसळली आहे.

आज खा. संजय राऊत यांनी आक्रमक भूमिका घेत थेट प्रांताधिकारी पवन दत्ता यांना फोनवरून जाब विचारला. तसेच पोलीस अधीक्षक डी. एस. स्वामी यांच्याकडेही तक्रार नोंदवली आहे. राऊत जिल्हाधिकारी कार्यालयात पोहोचले असता जिल्हाधिकारी आयुष प्रसाद हे बैठकीसाठी बाहेर गेले होते. त्यांच्या अनुपस्थितीत अतिरिक्त जिल्हाधिकारी हेमांगी पाटील यांनी शिष्टमंडळाशी चर्चा करण्याचा प्रयत्न केला.

# कल्याण-डोंबिवलीत
## २४ तास पाणीपुरवठा बंद




■ कल्याण

**कल्याण**-डोंबिवलीत २४ तास पाणीपुरवठा बंद ठेवण्याचा निर्णय महापालिकेने घेतला. सोमवार ११ मे रोजी रात्री १२ ते मंगळवार १२ मे रात्री १२ वाजेपर्यंत ही पाणीकपात लागू असणार आहे.

यंदा पावसाळा उशिरा सुरू होण्याची शक्यता हवामान विभागाने व्यक्त केल्यामुळे भविष्यात पाण्याची टंचाई निर्माण होऊ नये, यासाठी नियोजनाच्या दृष्टीने हा निर्णय घेण्यात आल्याचे कल्याण-डोंबिवली महापालिकेने स्पष्ट केले आहे. यासंदर्भात जलसंपदा विभागासोबत बैठक घेऊन हा निर्णय अंतिम करण्यात आला. या कालावधीत नागरिकांनी आधीच पाण्याचा साठा करून ठेवावा आणि पाण्याचा अपव्यय टाळावा, असे आवाहन महापालिकेने केले. पाणीकपातीमुळे नागरिकांची गैरसोय होण्याची शक्यता असून, नागरिकांनी संयम बाळगून प्रशासनाला सहकार्य करावे, असेही महापालिकेने म्हटले आहे.

# महापालिका रुग्णालयातील
## स्वच्छता कंत्राट अखेर मागे





■ मुंबई

**मुंबई** महापालिकेच्या ८ प्रमुख रुग्णालयांच्या स्वच्छतेसाठीचा १०१ कोटी रुपयांचा वादग्रस्त कंत्राट प्रस्ताव मागे घेण्यात आला. या प्रक्रियेत मोठा गैरव्यवहार झाल्याचा आरोप करण्यात आला होता. कंत्राटदाराची नियुक्ती आणि प्रक्रियेतील त्रुटींमुळे स्थायी समितीने हा प्रस्ताव दफ्तरी दाखल केला. याप्रकरणी चौकशी करून संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याचे निर्देश स्थायी समिती अध्यक्ष प्रभाकर शिंदे यांनी दिले.

पालिकेच्या केईएम, सायन, नायर कूपर प्रमुख रुग्णालयांसह भगवती, अगरवाल, जोगेश्वरी ट्रामा,नायर दंत या रुग्णालयांमधील स्वच्छतेचे तब्बल १०१ कोटींचे कंत्राट देण्याचा प्रस्ताव काल स्थायी समितीमध्ये मंजुरीसाठी आला होता. एकाच कंपनीला आठही रुग्णालयांच्या स्वच्छतेचे काम देण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला होता. मात्र सर्व पक्षीय सदस्यांनी त्या प्रस्तावाला विरोध केला. प्रस्ताव मंजुरीसाठी आलेले असताना काही रुग्णालयांमध्ये आधीच मार्च महिन्यातच कामाला सुरुवात झाली असल्याचा आरोप आरोग्य समिती अध्यक्ष हरिष भांदिर्गे यांनी केला. त्यानंतर बहुसंख्य सदस्यांच्या दबावामुळे हा प्रस्ताव दफ्तरी दाखल करत असल्याचे समितीचे अध्यक्ष प्रभाकर शिंदे यांनी जाहीर केले. तसेच मार्च महिन्यात काम सुरू करून आता हा प्रस्ताव मंजुरीला आला.

# नवाकाळ शब्दकोडे–१५९९



**आडवे शब्द –**

१. आघात, दणका, वार ३. स्तुत्य, कौतुकास्पद ६. 'आंधळं दळतं आणि ×× ×× ××' ९. उणीव १०. शिवाय, आणखी ११. तुकडा, भाग १४. डुक्कर, सूकर १६. अंत, मर्यादा १८. थंडगार २०. तयार, सिद्ध २१. रात्र, मुलींचे एक नाव २२. तळतळाट लागलेला, बाधित २४. प्रिया तेंडुलकरची पूर्वी गाजलेली मालिका २६. आनंद, मोद २७. केस कापणे २८. मळलेले ३१. शांत, कोणताही आवाज नसलेले ३३. कमतरता, वाळवी ३५. नाराजी ३६. भांडण ३८. कपडे शिवणारा ३९. पूर्वज ४१. अथवा ४३. कपी ४४. दक्ष ४५. नोकर ४७. रावणाचा झोपाळू भाऊ ४९. परस्परसंबंध, तार्किक नाते ५०. गणपती ५१. मोठी नौका, गलबत ५३. प्राणायामातील श्वास रोखून धरण्याची स्थिती ५४. कबूल, तयार ५५. रुग्ण, व्याधीग्रस्त ५६. ऊस ५८. खोट्या गोष्टी, मारलेल्या बाता ५९. लग्ननिश्चितीचा कार्यक्रम ६१. मत्सर ६२. नृप ६३. पेंग, झापड ६४. बेशिस्त, घाणेरडे ६५. पूल ६६. सत्त्व ६७. पौर्णिमा ६८. देह, शरीर ६९. अप्रत्यक्षपणे सुचवलेले, ध्वनित ७२. बालकृष्णाला मारण्याचा प्रयत्न करणारी राक्षसी ७३. प्रत्येक दिवशी ७४. सामान्य, किरकोळ ७६. बोलावणे ७७. त्रास, वेदना ७८. सगळे ७९. सिंहासन ८०. ज्यांच्यात सुधारणा शक्य नाही असे लोक ८२. गणगोत ८३. मर्कट ८५. याने लिहिलेला मजकूर खोडरबरने पुसता येतो ८७. रात्रीचा पाऊस, एक पक्षीविशेष ८९. महाभारतातील खादाड राक्षस ९१. शिस्तप्रिय स्वभाव ९३. कंठ ९६. थोड्या वेळापूर्वी ९७. पिकलेला फणस १०१. तीव्र चुरस, दोरखंड दोन बाजूंनी ओढण्याचा सांघिक खेळ १०३. तळण्यासाठी दोन कानांचे पसरट पातेले १०४. अस्वस्थ, भांबावलेला १०५. विशेष टिप्पणी १०६. ध्वनी

**उभे शब्द –**

१. पराक्रमी, ऐश्वर्यवान २. लोभी ३. वंदन, नमस्कार ४. उत्सवाचा दिवस ५. साफल्य ६. घराणे, वंश ७. त्रासलेला, छळ झालेला ८. कंडू १२. श्रम १३. खुमारी १५. हसण्याची लाट १७. चंद्र १८. मथळा १९. लाट २०. समंजस २१. तल्लीन २३. अगदी बारीक पीठ २५. पाणी २९. युधिष्ठिराचे अर्धसत्य वचन ३०. दमणूक ३२. बैलाच्या मानेवरील उंचवटा ३४. व्यास मुनींची आई ३७. चिंतन ४०. कुमक ४२. प्रयत्नांची पराकाष्ठा ४४. समुद्र ४६. फुलांची माळ ४८. फायदा ५०. बुद्धिबळातील ताकदवान सोंगटी, प्रधान ५२. संन्यासी ५३. कानातील लोंबता दागिना ५३अ. गोष्ट, कहाणी ५४. भस्म ५६. दुखापत ५७. सोटा ५८अ. जागा भाड्याने घेताना न परतीच्या बोलीवर दिलेली रक्कम ५९. निष्पाप ६०. शेपूट ६१. मुद्दाम ६२. ढीग ६६. कापडी तंबू ६७. उघडपणे, दिवसाढवळ्या ६८. खानदानी ७०. जाणता, निष्णात ७१. जावयाला वाण म्हणून दिला जाणारा पदार्थ ७५. विपुल ७६. अयोध्यानगरी ७७अ. भाजण्याचे साधन ७८. सारखे ८१. चक्काचूर ८४. उतरती कळा, ऱ्हास ८५. प्रवेश ८६. शाळकरी मेव्यातील फळ ८८. व्याघ्र ९०. बनारस ९२. रुधिर ९४. रथ हाकणारा ९५. शेवट ९६. कळी, अंकुर ९८. द्रवरूप धातू ९९. शिवाचे उपासक १००. सांप्रत, सध्या १०२. स्वाद •

**नवाकाळ कोडे क्रमांक १५९८ चे उत्तर**

**आडवे शब्द :** १. मातबर ४. रसद ६. अयशस्वी ९. शिला ११. अनुरक्त १२. फलश्रुती १३. काळवीट १४. कर्ता १६. पावन १८. दीर १९. अवसानघातकी २२. मतदान २४. सुळका २६. देहावसान २७. लहर २९. पोट ३०. सन ३१. उमेद ३२. तगडा ३४. कालिका ३५. माघार ३६. हशील ३८. गडप ४१. निश्चित ४३. माज ४४. रडगाणे ४६. पाठराखण ४९. मागमूस ५१. खाज ५२. कावा ५३. अर्धसत्य ५४. मित ५५. फुलका ५७. तोरा ५८. लता ५९. जामात ६०. रजक ६१. धंदा ६२. इंद्रजाल ६४. वीज ६५. टवळी ६७. हेतू ६९. रमा ७१. संदेह ७२. मात ७४. पसा ७६. ललिता ८०. हाव ८४. बहु ८५. धाकटा ८७. हनुमानचालिसा ८९. लकेर ९०. जाणकार ९२. रजा ९३. साय ९४. मर्दन ९६. दंभ ९७. सलाम ९९. सुती १००. कीटकनाशक १०१. रेवती १०२. नयन

**उभे शब्द :** १. माझ्याकडे देव माझा पाहतो आहे २. बळे ३. हनुमान ४. रक्तपात ५. दफन ६. अश्रुपात ७. यती ८. स्वीकार ९. शिवीगाळ १०. लाट १५. अवसान १७. वकील १८. दीन १९. अवसर २०. सान २१. घालमेल २२. मरगळ २३. दासी २४. सुटका २५. काटा काढणे २८. हत ३१. उशीर ३३. धड ३७. पाश्चिमात्य ३८. गज ३९. परज ४०. रखवालदार ४२. तग ४३. मास ४५. गाफील ४७. राका ४८. अर्धचंद्र ५०. मूठमाती देणे ५१. खातरजमा ५५. फुकट ५६. काचोळी ६३. जास्त ६६. वर्ण ६८. तूप ७०. माल ७३. तहानलेला ७५. साबरमती ७७. लिखाण ७८. कैक ७९. अनुजा ८१. वचा ८२. पसायदान ८३. सुलभ ८५. धार ८६. टापू ८७. हरभरे ८८. लिसा ९०. जानकी ९१. काटक ९५. वंश ९७. सती ९८. मन

# आधी ११८ आमदारांच्या सह्या आणा! मगच शपथविधी

पान १ वरून

आहे. त्यांना सरकार स्थापन करण्यासाठी आमंत्रित न करणे, हे तामिळनाडूच्या जनतेने दिलेल्या जनादेशाचा अपमान करण्यासारखे ठरेल. २३३ निवडून आलेले सदस्य अद्यापि पदाची शपथ घेऊ शकलेले नाहीत. हा राज्याचा अपमान आहे, हा लोकशाहीला धक्का आहे. विजय हे जिंकलेल्या दोन जागांपैकी एक जागा रिक्त करणार असल्याने विधानसभेतील टीव्हीकेची संख्या आणखी एकने कमी होऊन १०७ होणार आहे. काँग्रेसच्या ५ आमदारांचा पाठिंबा धरून एकूण संख्या सध्या ११२ होणार असल्याने बहुमतासाठी टीव्हीकेला आणखी सहा आमदारांची गरज आहे. यासाठी टीव्हीकेला अण्णा द्रमुक किंवा द्रमुक यांचा पाठिंबा घेण्याशिवाय गत्यंतर नाही. अण्णा द्रमुकच्या २० हून अधिक आमदारांनी टीव्हीकेला पाठिंबा द्यावा, अशी मागणी पक्षाकडे केली आहे. मात्र, अण्णा द्रमुकने याचा इन्कार केला आहे. मात्र, आज अण्णा द्रमुकने फोडाफोडीच्या भीतीने आपल्या २५ आमदारांना पुद्दुचेरीच्या रिसॉर्टमध्ये ठेवले आहे. अण्णा द्रमुक आणि द्रमुक यांनी एकत्र येऊन सत्तास्थापन करण्याच्या हालचाली सुरू केल्याचेही सांगितले जात आहे. मात्र, अधिकृतरित्या यावर दोन्ही पक्षांनी काही भाष्य केले नाही.

विद्यमान विधानसभेचा कार्यकाळ ९ मे रोजी संपत असल्याने राज्यपालांकडे निर्णय घेण्यासाठी अजून काही दिवस शिल्लक आहेत. मात्र, भारतीय संविधानातील कलम १६४(१) नुसार राज्यपालांना मुख्यमंत्री नेमण्याचा अधिकार आहे. त्रिशंकू विधानसभेच्या परिस्थितीत योग्य उमेदवार निवडण्याचे स्वातंत्र्यही राज्यपालांना दिले गेले आहे. यापूर्वी अनेक राज्यांमध्ये सर्वात मोठ्या पक्षाच्या नेत्याला अल्पमत सरकार स्थापनेचे निमंत्रण देण्यात आलेले आहे.

दरम्यान, तामिळनाडूमध्ये राष्ट्रपती राजवट लागू करून पुन्हा निवडणुका घ्याव्यात, अशी मागणी झोहो कॉर्पोरेशनचे संस्थापक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीधर वेंबू यांनी केली आहे. वेंबू यांनी सोशल मीडियावर म्हटले की, सध्याचे आकडे जुळताना दिसत नाहीत. कशीही जुळवाजुळवी करून स्थापन केलेले सरकार स्थिर राहण्याची शक्यता कमी आहे. पुन्हा निवडणुका झाल्यास टीव्हीकेलाच बहुमत मिळण्याची शक्यता आहे. मात्र, भाजपाने ही निवडणूक स्वतंत्रपणे लढवावी.

### विजय यांच्या ३०० कोटींच्या एफडीची सोशल मीडियावर चर्चा

अभिनेता-राजकारणी विजय यांच्या निवडणुकीतील यशानंतर आता त्यांच्या मालमत्तेची सोशल मीडियावर जोरदार चर्चा सुरू झाली आहे. विशेषत: त्यांच्या जवळपास ३१३ कोटी रुपयांच्या फिक्स्ड डिपॉझिट (एफडी) चर्चेचा विषय ठरल्या आहेत. एक्सवरील अनेक युजरनी विजय यांच्या गुंतवणुकीवर प्रतिक्रिया दिल्या आहेत. एका युजरने म्हटले की, विजय जोखीम टाळणारे गुंतवणूकदार दिसतात. मात्र त्यांना योग्य आर्थिक सल्ला मिळालेला नसावा. विजय यांनी मोठ्या सार्वजनिक क्षेत्रातील कंपन्यांच्या उच्च लाभांश देणाऱ्या शेअर्समध्ये गुंतवणूक करावी. आणखी एका युजरने, अशा खराब गुंतवणुकीचा सल्ला त्यांना कोणी दिली? असा सवाल उपस्थित केला.

# चंद्रनाथ रथ यांची हत्या पूर्वनियोजित

पान १ वरून

माहितीनुसार काल रात्री दहाच्या सुमारास उत्तर २४ परगणा जिल्ह्यातील मध्यग्राम येथे चंद्रनाथ रथ यांच्या वाहनाचा पाठलाग करण्यात आला. एका सॅन्ट्रो कारने त्यांच्या स्कॉर्पिओ गाडीला अडवले. त्यानंतर मोटरसायकलवरून आलेल्या हल्लेखोरांनी जवळून गोळीबार केला. रथ यांच्या छाती, पोट आणि डोक्यात गोळ्या लागल्या. त्यांना तातडीने खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. या हल्ल्यात रथ यांच्या वाहनचालकालाही दुखापत झाली असून त्यांच्यावर कोलकात्यातील एसएसकेएम रुग्णालयात उपचार सुरू आहेत. त्यांची प्रकृती गंभीर असल्याचे सांगितले जात आहे. पोलिसांनी घटनास्थळावरून गोळ्यांचे खोके, जिवंत काडतुसे आणि इतर पुरावे जप्त केले आहेत. हल्लेखोरांनी ऑस्ट्रियन बनावटीची ग्लॉक पिस्तूल वापरल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. तसेच हल्ल्यात वापरलेल्या मोटारसायकलवर नंबर प्लेट नसल्याचेही समोर आले आहे. पश्चिम बंगालचे पोलीस महासंचालक सिद्ध नाथ गुप्ता यांनी सांगितले की, या प्रकरणाशी संबंधित एक वाहन जप्त करण्यात आले आहे. वाहनाची नंबर प्लेट बदलण्यात आली होती. पोलीस सध्या सीसीटीव्ही फुटेज तपासत असून, संशयितांचा शोध घेत आहेत. या प्रकरणात तीन स्थानिक गुन्हेगारांची चौकशी सुरू असून, मुख्य आरोपी अद्याप फरार आहेत. हल्लेखोरांनी ऑस्ट्रियन बनावटीची ग्लॉक पिस्तूल वापरली असावी, असा संशय पोलिसांना आहे.

भाजपा नेते सुवेंधू अधिकारी यांनी म्हटले की, ही हत्या पूर्वनियोजित असून, चंद्रनाथ रथ यांच्या निधनाने माझे हे वैयक्तिक नुकसान झाले आहे. आजूबाजूच्या भागात अनेक घटना घडल्या आहेत. पोलीस संपूर्ण प्रकरणाचा तपास करत आहेत. ही पूर्वनियोजित हत्या आहे. माझ्यासाठी हा वैयक्तिक धक्का आहे. तर भाजपा नेते अर्जुन सिंग यांनी तृणमूलचे सरचिटणीस अभिषेक बॅनर्जी यांच्यावर या हत्येचा कट रचल्याचा आरोप केला. सत्ता नसतानाही आम्ही अजूनही प्रभावी आहोत, हा संदेश देण्याचा त्यांचा प्रयत्न आहे, असे ते म्हणाले. तृणमूलने मात्र हे आरोप फेटाळून लावत या हत्येचा निषेध केला आहे. भाजपाने पोसलेल्या गुंडांनीच ही हत्या केल्याचा आरोप केला आहे. लोकशाहीत हिंसा आणि राजकीय हत्या यांना स्थान नसल्याचे सांगत पक्षाने न्यायालयाच्या देखरेखीखाली चौकशी करण्याची मागणी केली आहे. दरम्यान, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आज कोलकात्याला पोहोचले. त्यांनी निवडून आलेल्या भाजपाच्या आमदारांची बैठक घेतली. ९ मे रोजी बंगालच्या मुख्यमंत्र्यांचा शपथविधी होणार आहे.


**सार्वजनिक सूचना**

सूचना दिली जाते की श्री नानू परबत वालिया हे कालिना को-ऑपरेटिव हाऊसिंग सोसायटी लिमिटेडचे सदस्य आहेत, जे ए 5/19 सुंदर नगर, कालिना, सांताक्रुझ (पूर्व),, मुंबई – 400 098 येथे स्थित आहे आणि त्यांना रॉ हाऊस क्र. A-9/34 मध्ये राहण्यासाठी व्यावसायिक अधिकार आहेत. सदस्यांनी कळवले आहे की त्यांनी मूळ शेअर सर्टिफिकेट क्र. 83 दिनांक 07.07.2008, ज्याचे विशिष्ट शेअर क्रमांक 777 ते 781 (सर्व समावेशित) आहेत, ते गमावले आहे. समोरच्या सोसायटीकडून मूळ शेअर सर्टिफिकेट क्र. 161 दिनांक 01.09.1963 च्या जागी डुप्लिकेट शेअर सर्टिफिकेट जारी केले होते. श्री नानू परबत वालिया यांनी डुप्लिकेट शेअर सर्टिफिकेट जारी करण्यासाठी सोसायटीकडे अर्ज केला आहे. ज्यापैकी कोणत्याही व्यक्तीस किंवा व्यक्तींना ह्या शेअर्सबाबत मॉर्टगेज / धारा इ. स्वरूपात दावा असलेला असेल, त्यांनी हा दावा कालिना को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लिमिटेडच्या माननीय सचिवांकडे खाली दिलेल्या पत्त्यावर नोटीस प्रकाशित झाल्यापासून 15 दिवसांच्या आत नोंदवावा, अन्यथा सोसायटी डुप्लिकेट शेअर सर्टिफिकेट जारी करेल.

मुंबई दिनांक या गुरुवार 08.05.2026 रोजी

स्वाक्षरी/-
डि. एन. नायर
माननीय सचिव
कलिना सहकारी गृहनिर्माण संस्था लिमिटेड
ए 5/19, सुंदरनगर, कलिना, सांताक्रुझ (पूर्व), मुंबई – 400 098
ईमेल: kchs2008@rediffmail.com



**जाहीर सूचना**

युनिट नं. एफ ११२, आदर्श इंडस्ट्रियल को. ऑप. हाऊसिंग सोसायटी लि., चकाला, अंधेरी (पूर्व), मुंबई – ४०००९९, येथील कायदेशीर मालक श्रीमती प्रतिभा शैलेश शाह (मूळ मालक शैलेश रामनिकलाल शाह होते) यांनी, त्यांचे शेअर प्रमाणपत्र नं. ९५ हरवल्यामुळे/गहाळ झाल्यामुळे, मूळ शेअर प्रमाणपत्र नं. ०४७१ ते ०४७५ च्या बदल्यात दुय्यम शेअर प्रमाणपत्र मिळवण्यासाठी सोसायटीकडे संपर्क साधला आहे. मूळ प्रमाणपत्रावर कोणत्याही स्वरूपाचा दावा असलेल्या कोणत्याही व्यक्तीने, नोटीसच्या तारखेपासून १४ दिवसांच्या आत, वर नमूद केलेल्या पत्त्यावर सोसायटीला लेखी कळवावे; असे न केल्यास, सोसायटी दुय्यम शेअर प्रमाणपत्र जारी करेल आणि अशा व्यक्तीचा दावा सोडून दिला आहे किंवा त्यागलेला आहे असे मानले जाईल.

सही/-
दिनांक: ०८-०५-२०२६ सचिव



**PUBLIC NOTICE**

Notice is hereby given that my client Mr. Atul Khedekar, being grandson and one of the legal heirs of Late Shri Vasant Trimbak Gothivarekar, is claiming rights in respect of Room No. 23, 1st Floor, 28/44, Shantaram Chawl, Tatya Gharpure Marg, Mugbat Lane, Girgaon, Mumbai – 400004.

It is stated that Mr. Vikas Trimbak Gothivarekar, also a legal heir, has been missing for the past 20 years.

Any person having any claim, right, title or interest in the said premises is hereby required to notify the undersigned in writing with supporting documents within 14 days from the date of publication of this notice.

Failing which, it shall be presumed that no claim exists and my client shall be entitled to deal with the said premises without any objection.

Date: 08th May, 2026
Place: Mumbai

Adv. Amol R. Surve
Advocate for Mr. Atul Khedekar
Legal Links Advocates and Associates
Office no. 1, 14th Lane, Building no. 10, S. P. Road, Nagpada, Mumbai 400 008
Mobile no. 9930269138


# शेवटच्या पगाराच्या ५० टक्के पेन्शन राज्य कर्मचाऱ्यांना मोठा दिलासा

पान १ वरून

योजनेचा लाभ घेण्यासाठी इच्छुक कर्मचाऱ्यांना ३१ डिसेंबर २०२६ पर्यंत लेखी पर्याय सादर करावा लागणार असून, हा पर्याय स्वीकारणाऱ्या कर्मचाऱ्यांनाच योजनेचा लाभ मिळणार आहे. या सुधारित योजनेनुसार २० वर्षे किंवा त्यापेक्षा अधिक सेवा पूर्ण केलेल्या कर्मचाऱ्यांना शेवटच्या वेतनाच्या ५० टक्के इतके निवृत्तीवेतन मिळणार आहे, तर १० ते २० वर्षे सेवा असलेल्या कर्मचाऱ्यांना शेवटच्या वेतनाच्या आधारे सेवेच्या प्रमाणानुसार पेन्शन दिले जाईल. किमान १० वर्षे सेवा पूर्ण केल्यास दरमहा किमान ७,५०० रुपये पेन्शनची हमी देण्यात आली आहे. तसेच कुटुंबियांना मूळ पेन्शनच्या ६० टक्के इतका कुटुंब निवृत्ती वेतनाचा लाभ मिळणार आहे. निवृत्तीच्या वेळी राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेअंतर्गत जमा निधीपैकी ६० टक्के रक्कम शासनाकडे जमा करावी लागणार असून, ३१ मार्च २०२३ च्या शासन निर्णयानुसार ग्रॅच्युएटीचा लाभही कायम राहणार आहे.

# भोजशालात मंदिराच्या जागेवर मशीद बांधली

पान १ वरून

वास्तुचे संरक्षण करण्याची जबाबदारी पुरातत्त्व खात्यावर आहे.

मध्य प्रदेश उच्च न्यायालयाच्या इंदूर खंडपीठात न्या. विजय कुमार शुक्ला आणि न्या. अलोक अवस्थी यांच्या न्यायासनासमोर यासंबंधीच्या खटल्याची सुनावणी झाली. त्याप्रसंगी एएसआयच्या वतीने सॉलिसीटर जनरल सुनील कुमार यांनी वैज्ञानिक सर्वेक्षणाचा विस्तृत अहवाल न्यायालयासमोर सादर केला. वैज्ञानिक संशोधनात सापडलेले अवशेष, त्यावरील कोरीव लेणी आणि शिलालेख हे परामर राज्याच्या काळातील असल्याचे स्पष्ट होते. त्याआधारे या ठिकाणी आधी मंदिर होते असे म्हणण्यास वाव आहे, असे सुनील कुमार यांनी सांगितले.

# दुचाकी शिकताना अपघात! तरुणीचा मृत्यू

**नालासोपारा –** दुचाकी शिकताना अपघातात जखमी झालेल्या २० वर्षीय तरुणीचा मृत्यू झाला. दुचाकीवरून पडून तिच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली होती. सृष्टी दुबे (२०) असे या अपघातात मृत्यूमुखी पडलेल्या तरुणीचे नाव आहे. ती नायगाव पूर्वेच्या सोमेश्वर नगर येथे रहात होती. ३ मे रोजी ती दुचाकी शिकत होती. मात्र तिचे नियंत्रण सुटले आणि ती दुचाकीवरून खाली पडली. तिच्या डोक्याला जबर दुखापत झाली. तिला उपचारासाठी मुंबईच्या नायर रुग्णालयात दाखल करण्यात आले. तेथे बुधवारी उपचारादरम्यान तिचा मृत्यू झाला. या प्रकरणी पेल्हार पोलीस ठाण्यात अपमृत्यूची नोंद करण्यात आली आहे.


पुणे महानगरपालिका वैद्यकीय शिक्षण ट्रस्ट
**भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, पुणे.**
REG.NO.F54459/PUNE, DATE-13/8/2020, MAHA/461, DATE-10/7/2020
TEL-020-29980800, E-MAIL bavmc.purchase@gmail.com, bavmc.pmc@gmail.com

ई- निविदा नोटीस निविदा क्र. PMCMET/BAVMC/2026-27/001

पुणे महानगरपालिका वैद्यकीय शिक्षण ट्रस्टचे भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी वैद्यकीय महाविद्यालय, ठाकरे चौक, मंगळवार पेठ, मुलींचे वसतिगृह, सणस ग्राउंड, मुलांचे वसतिगृह, खराडी व वैद्यकीय महाविद्यालय, नायडू कॅम्पस, पुणे येथे ३६ साफसफाई सेवक पुरविणे, साफसफाई करणे व सुपरव्हिजन करणेकरीता इच्छुक असलेले अधिकृत ठेकेदारांकडून दोन लिफाफा (B-1 पद्धत) निविदा पध्दतीने ई-निविदा मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नाव | कामाची मुदत | कामाची अंदाजित रक्कम | निविदा सेटची किंमत | बयाणा रक्कम | अधिक माहितीसाठी दूरध्वनी क्र. |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | पुणे महानगरपालिका वैद्यकीय शिक्षण ट्रस्टचे भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी वैद्यकीय महाविद्यालय, ठाकरे चौक, मंगळवार पेठ, मुलींचे वसतिगृह, सणस ग्राउंड, मुलांचे वसतिगृह, खराडी व वैद्यकीय महाविद्यालय, नायडू कॅम्पस, पुणे येथे दररोज ३६ साफसफाई सेवक पुरविणे, साफसफाई करणे व सुपरव्हिजन करणे. | २४ महिने | २,४२,४३,३९२.९७ (B-1 पद्धत) | ११,९७९/- | १,५०,०००/- | ०२०-२९९८०८०० |

वरील कामाची ई-निविदा फॉर्म www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दि.०८/०५/२०२६ ते दि. १५/०५/२०२६ या कालावधीत ऑनलाईन उपलब्ध आहे. सदर निविदेसाठी निविदापूर्व बैठक दि. ११/०५ /२०२६ रोजी सायंकाळी ०४.०० वा. काऊंसिल हॉल, भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी वैद्यकीय महाविद्यालय, सणस कॅम्पस, ठाकरे चौक, मंगळवार पेठ, पुणे येथे आयोजित करण्यात येईल.

निविदा फॉर्म फी व बयाणा रक्कम ऑनलाईन जमा करावे. निविदा फॉर्म पोस्टाने पाठविल्यास स्वीकारले जाणार नाहीत. कोणतेही अथवा सदर निविदा कोणतेही कारण न देता मंजूर अथवा नामंजूर करण्याचा अधिकार मा. अधिष्ठाता, भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी वैद्यकीय महाविद्यालय यांनी राखून ठेवला आहे. निविदा दि. १५/०५/२०२६ रोजी दुपारी ०३.३० वाजेपर्यंत www.mahatenders.gov.in संकेतस्थळावर ऑनलाईन पद्धतीने स्वीकारले जातील. ई-निविदा उघडण्याचा दिनांक १६/०५/२०२६ रोजी दुपारी ०३.३० वा. असेल.

सही/-
डॉ. सुनिता सावंत
अधिष्ठाता (प्र.)
भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी वैद्यकीय महाविद्यालय, पुणे

जाहिरात क्र. २/९९ दि.१०/०५/२६

**महाराष्ट्र विधी सेवा प्राधिकरण, मुंबई मार्फत संपूर्ण महाराष्ट्र राज्यात दिनांक ०९.०५.२०२६ रोजी राष्ट्रीय लोक अदालतीचे नियोजन केले आहे**



**फॉर्म क्र. यूआरसी-२**

प्रकरण XXIच्या भाग I अन्वये नोंदणीकरणाबाबत सूचना देणारी जाहिरात [कंपनी कायदा, २०१३ चे कलम ३७४(बी) आणि कंपनी (नोंदणीकरिता प्राधिकृत) विनियमन, २०१४ च्या विनियमन ४(१) नुसार]

१. कंपनी कायदा, २०१३ च्या कलम ३६६ च्या उप-कलम (२) अन्वये याद्वारे सूचना देण्यात येते की, कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालयाअंतर्गत कंपनी निबंधक, मुंबई यांच्याकडे अर्ज करण्यात येणार आहे की, इनफ्लो कॉपरेक्स सोल्युशन्स एलएलपी या मर्यादित दायित्व भागिदारी संस्थेचे, कंपनी कायदा, २०१३ च्या प्रकरण XXIच्या भाग I अन्वये समभागांद्वारे मर्यादित कंपनी असे नोंदणीकरण होऊ शकते;

२. कंपनीची प्रमुख उद्दिष्टे खालीलप्रमाणे आहेतः फेरस आणि नॉन-फेरस धातू, स्टील, कार्बन स्टील, अलॉय स्टील, स्पेशल आणि स्टेनलेस स्टील, शाफ्टिंग, बार, रॉड, फ्लॅट्स, स्क्रॅप स्पंज आयर्नपासून बनवलेले स्क्वेअर, प्री-रिड्यूस्ड पेलेट्स, बिलेट्स, इंगॉट्स, पाईप्स, फ्लॅट्स, अँगल, राऊंड्स, स्क्वेअर्स, रेल्स, जॉइंट्स, चॅनल्स, विंडो सेक्शन, स्पेशल सेक्शन, एक्सपान्डेड मेटल्स, हिंजेस, हूप्स, सर्कल्स, कास्टिंग आणि अलॉय मेटल्स, तांब्याचे एक्सट्रूजन यांचे व्यापारी, उत्पादक, प्रोसेसर, फॅब्रिकेटर, ड्रॉवर आणि रोलर्स हा व्यवसाय चालवणे.

३. प्रस्तावित कंपनीचा निवेदन मसुदा आणि संघटनेची घटनेची प्रत ३८०/३८८ १ला मजला, मॅजेस्टिक मेन्शन, एसव्हीपी रोड, हरकिशन दास रुग्णालय, गिरगाव, मुंबई ४००००४, महाराष्ट्र, मुंबई येथील कार्यालयात पाहता येईल.

४. याद्वारे सूचना देण्यात येते की, कोणाही व्यक्तीचा या अर्जास आक्षेप असल्यास त्यांनी त्यांचे आक्षेप लेखी स्वरुपात कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालयाअंतर्गत कंपनी निबंधक, मुंबई यांना या सूचनेच्या प्रसिद्धी दिनांकापासून एकवीस दिवसांच्या आत कळवावे व त्याची प्रत कंपनीला त्यांच्या नोंदणीकृत कार्यालय येथे पाठवावी.

दिनांक शुक्रवार, ८ मे, २०२६

इनफ्लो कॉपरेक्स सोल्युशन्स एलएलपी करिता
महेंद्र कनकराज मेहता
डीआयएनः ०१९०८७०८
(नियुक्त भागीदार)
कनकराज नारायणमल मेहता
डीआयएनः ०२००८८०५
(नियुक्त भागीदार)


# बिहारमध्ये सम्राट मंत्रिमंडळाचा विस्तार नितीश पुत्रासह ३२ मंत्र्यांचा शपथविधी

पान १ वरून

निशांत कुमार यांना प्रथमच मंत्रिपद मिळाले आहे. कार्यक्रमाच्या सुरुवातीला राष्ट्रगीत वाजवण्यात आले. नव्या प्रोटोकॉलनुसार आधी 'वंदे मातरम' वाजवले जाणे अपेक्षित होते. जदयूकडून निशांत कुमार, बुलो मंडल आणि श्वेता गुप्ता हे तीन नव्या चेहऱ्यांचा मंत्रिमंडळात समावेश करण्यात आला आहे. भाजपाकडूनही ५ नव्या चेहऱ्यांना संधी दिली. त्यामध्ये मिथिलेश तिवारी, रामचंद्र पासवान, अरुण शंकर प्रसाद, नंद किशोर राम आणि इंजिनिअर शैलेन्द्र यांचा समावेश आहे. मंत्रिमंडळात ईबीसी १०, ओबीसी-६, दलित-७, सवर्ण-९ आणि मुस्लीम-१ असे जातीय समीकरण आहे. पाच महिला मंत्र्यांचा समावेश असून, त्यापैकी ३ जदयूच्या आहेत.


महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

**ई–निविदा सुचना**

बारामती विभागाअंतर्गत देखभाल दुरुस्तीच्या कामासाठी (Preventive Maintenance) रोहित्र देखभाल दुरुस्ती – **ई – निविदा क्रमांक EE / BMT/T-02/2026-27,** उच्चदाब वाहिनी देखभाल दुरुस्ती – **ई – निविदा क्रमांक EE / BMT/T-03/2026-27** व लघुदाब वाहिनी देखभाल दुरूस्ती – **ई – निविदा क्रमांक EE/BMT/T-04/2026-27 (प्रतेकी १२५ लक्ष रक्कमेची)** ठेका पध्दतीने नामांकित / नोंदणीकृत अनुभवी ठेकेदार यांचेकडुन ई–निविदा मागविण्यात येत आहेत. निविदा विक्री कालावधी ०७.०५.२०२६ ते १४.०५.२०२६, १५.०० पर्यंत, निविदा भरण्याची अंतिम तारीख १४.०५.२०२६, तांत्रिक निविदा उघडणेची तारीख १५.०५.२०२६ काही अपरिहार्य कारणस्तव नियोजित तारखेस निविदा न उघडल्यास दुसऱ्या दिवशी उघडण्यात येतील. इसारा शुल्क ऑनलाईन / बिजीच्या स्वरुपात निविदा भरणा मुदतपूर्वी विभागीय कार्यालयात भरणे आवश्यक आहे.

अधिक माहिती कृपया कंपनीचे संकेतस्थळ https://etender.mahadiscom.in/eatApp/

कार्यालयाचा पत्ता: ऊर्जा भवन, भिगवण रोड, बारामती. फोन नं –२४३१७२

PRO No:- PRO/HO/111/2026-27 कार्यकारी अभियंता, बारामती

# नवाकाळ

• मुंबई । शुक्रवार ८ मे, २०२६ • पान -८


## भीमाशंकर मंदिर ३१ मेपासून भाविकांसाठी पुन्हा खुले होणार



**पुणे** - श्री भीमाशंकर ज्योतिर्लिंग मंदिर येथील मुरव्य सभामंडपाच्या पुनर्बांधणीसह विविध सुरक्षा आणि सुविधा विकासकामांमुळे गेल्या साडेतीन महिन्यांपासून बंद असलेले मंदिर ३१ मेपासून पुन्हा भाविकांच्या दर्शनासाठी खुले करण्यात येणार आहे. जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी ही माहिती दिली. भीमाशंकर तीर्थक्षेत्र विकास आराखड्यांतर्गत मंदिर परिसरातील गर्दी व्यवस्थापन, भाविकांची सुरक्षितता आणि सुविधा वाढवण्यासाठी ही कामे हाती घेण्यात आली होती. सुरुवातीला ९ जानेवारीपासून तीन महिन्यांसाठी मंदिर बंद ठेवण्याचे नियोजन करण्यात आले होते. मात्र, कामांच्या प्रगतीनुसार ही मुदत वाढवून ३१ मेपर्यंत करण्यात आली. सिंहस्थ कुंभमेळा २०२७ च्या पार्श्वभूमीवर भविष्यात वाढणारी भाविकांची संरव्या लक्षात घेऊन मंदिर परिसराचा विकास करण्यात येत आहे. यासाठी जिल्हा नियोजन समितीमार्फत २८८.१७ कोटी रुपयांच्या निधीला मंजुरी देण्यात आली आहे. या विकासकामांमध्ये भव्य नवीन सभामंडप उभारणी, जुन्या सभामंडपाचे हटवणे, पायरी मार्गाची निर्मिती, प्रवेश-निर्गमन मार्गांचे आधुनिकीकरण, गर्दी नियंत्रण व्यवस्था, व्ह्यूईंग कॉरिडॉर आणि विश्रांती क्षेत्रांचा समावेश आहे.

## ‘टीसीएस’मधील धर्मांतर प्रकरणाची निदा खान सूत्रधार असल्याचा संशय

■ नाशिक

**नाशिकमधील** बहुचर्चित टीसीएस (टाटा कंसल्टन्सी सर्विस) कंपनीतील लैंगिक अत्याचार आणि बेकायदेशीर धर्मांतर प्रकरणाला आता नवे वळण मिळाले आहे. या प्रकरणातील मुख्य संशयित आरोपी निदा खान हिच्याकडेच धर्मांतर घडवून आणण्याची महत्त्वाची जबाबदारी सोपवण्यात आली होती. तसेच ठराविक टार्गेट देण्यात आल्याचा संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे. सध्या निदा खान फरार असून, नाशिक पोलिसांकडून तिचा शोध सुरू आहे.



मुंबई नाका आणि देवळाली कॅम्प पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या गुन्ह्यांमध्ये निदा खान ही वॉन्टेड आरोपी आहे. टीसीएसमधील एका पुरुष कर्मचाऱ्यासह महिला कर्मचाऱ्याचे धर्मांतर घडवून आणण्याचा प्रयत्न झाल्याची माहिती पोलिसांना मिळाली. तसेच हिंदू महिला कर्मचाऱ्यांच्या धार्मिक भावना दुखावणे, गुंगी आणणारे पदार्थ वापरून अत्याचार करणे आणि पीडितांना धमकावणे असे गंभीर आरोप या प्रकरणात करण्यात आले आहेत. एसआयटीच्या हाती लागलेल्या काही पुराव्यांनुसार, निदा खान ही केवळ या कटात सहभागी नव्हती, तर काही विशिष्ट व्यक्तींना लक्ष्य करण्याचे काम तिच्याकडे देण्यात आले होते, असा संशय तपास अधिकाऱ्यांनी व्यक्त केला आहे.

## राज्यसभेसाठी आग्रह नाही छगन भुजबळ यांचे वक्तव्य

■ मुंबई

**उपमुख्यमंत्री** सुनेत्रा पवार यांनी बारामती विधानसभा मतदारसंघातून आमदार म्हणून निवडून आल्यानंतर

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

राज्यसभेच्या खासदारकीचा राजीनामा दिला आहे. त्यामुळे रिक्त झालेल्या या जागेवर कोणाची निवड होणार, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे. या जागेसाठी ज्येष्ठ नेते व मंत्री छगन भुजबळ यांचे नाव चर्चेत आहे. मात्र राज्यसभेसाठी माझा कोणताही आग्रह नाही असे त्यांनी म्हटले आहे. राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये या घडामोडींनंतर हालचालींना वेग आला असून, रिक्त जागेसाठी अनेक नावांची चर्चा सुरू आहे. यावर बोलताना छगन भुजबळ म्हणाले, मी सध्या राज्यात ज्येष्ठ मंत्री म्हणून काम पाहत आहे. माझ्याकडे मंत्रिपदाची जबाबदारी आहे. त्यामुळे राज्यसभेसाठी आग्रह धरणे योग्य ठरणार नाही.

## अनिल अंबानीच्या कंपन्या अदानी घेणार! कोर्टात निवेदन



■ नवी दिल्ली

**रिलायन्स** अनिल अंबानी उद्योग समूहातील कंपन्या ताब्यात घेण्याचा अदानी समूहाचा प्रयत्न आहे. त्यामुळेच अदानी समूहाची सर्वाधिक हिस्सेदारी असलेली एनडीटीव्ही वाहिनी आपल्याविरोधात गेले काही महिने बदनामीकारक वृत्त प्रसारित करत आहे, असा आरोप उद्योगपती अनिल अंबानी यांनी दिल्ली उच्च न्यायालयात केला. अनिल अंबानी यांनी एनडीटीव्ही विरुद्ध दोन कोटी रुपयांचा अब्रूनुकसानीचा दावा दाखल केला आहे. या खटल्याच्या सुनावणीदरम्यान अनिल अंबानींच्या वकिलांनी न्यायालयात हा आरोप केला.

केंद्रीय तपास यंत्रणा सीबीआय आणि अंमलबजावणी संचलनालयाने रिलायन्स कंपनीविरूद्ध गैरव्यवहारप्रकरणी खटले दाखल केले आहेत. तपासादरम्यान कंपनीशी संबंधित कोणत्याही अधिकाऱ्याला अटक केली जाते, तेव्हा एनडीटीव्ही विनाकारण आपल्या नावाचा वारंवार उल्लेख करून आपली बदनामी करते, असा अनिल अंबानींचा आरोप आहे. या आरोपाच्या पुष्ट्यर्थ अनिल अंबानींच्या विकिलांनी एनडीटीव्ही वाहिनीवर रिलायन्सवरील खटल्यासंदर्भात प्रसारित करण्यात आलेल्या ७२ बातम्यांच्या व्हिडिओ क्लिप पुराव्यादाखल न्यायालयात सादर केला. त्यावर हा मुद्दा घटनेतील भाषणस्वातंत्र्याशी संबंधित आहे. त्यामुळे आम्ही एनडीटीव्ही वृत्तवाहिनीला तूर्त नोटीस पाठवून भूमिका स्पष्ट करण्यास सांगत आहोत, असे न्यायालयाने सांगितले. या प्रकरणी पुढील सुनावणी १९ जुलै रोजी होणार आहे.

## कोकणात आंबा, काजूचे पंचनामे संथगतीने सुरू! शेतकरी संतप्त

■ कणकवली

**कोकणात** अवकाळी पाऊस आणि हवामान बदलामुळे आंबा-काजू पिकांचे अतोनात नुकसान झाले आहे. या नुकसानग्रस्त बागांचे पंचनामे संथगतीने सुरू असल्याने शेतकऱ्यांमध्ये संताप आहे. ३० एप्रिलपर्यंतच्या मुदतीत केवळ ७.७० टक्के इतक्या क्षेत्राचे पंचनामे पूर्ण झाले आहेत. दुसरीकडे या नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना शासनाने हेक्टरी फक्त २२ हजार घोषित केल्याने त्याविरुद्ध शेतकऱ्यांनी १५ मे रोजी ‘वर्षा’वर मोर्चा आयोजित केला आहे.

जिल्ह्याचे पालकमंत्री नितेश राणे यांनी तत्काळ पंचनामे पूर्ण करून शासनाला सविस्तर अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. तरीही प्रत्यक्षपणे या कामात कमालीची दिरंगाई असल्याचे दिसत आहे. आता पंचनाम्यासाठी १० मे ही अंतिम मुदत निश्चित केली आहे. जिल्ह्यातील आंबा पिकाचे एकूण क्षेत्र २५,६०२ हेक्टर असून आतापर्यंत २,९९७ हेक्टर ११.७१ क्षेत्राचे पंचनामे पूर्ण झाले आहेत. काजू पिकाचे उत्पादनक्षम क्षेत्र ५८,०३७ हेक्टर असून त्यापैकी ३,४२५.४५ हेक्टर ५.९४ टक्के क्षेत्राचे पंचनामे झाले आहेत.

## मुंबईतील मच्छीमारांनी आता जिलेबी-फाफडा विकायचा का?

**संदीप देशपांडेंचा संतप्त सवाल**

■ मुंबई

**मुंबईतील** वाकोला (धोबीघाट) येथील मासळी बाजारात मासे कापणे आणि स्वच्छ करण्यावर कथित बंदी घालण्यात आल्याच्या मुद्यावरून महाराष्ट्र नवनिर्माण सेना आक्रमक झाली आहे. मुंबईतील मच्छीमारांनी आता जिलेबी-फाफडा विकायचा का? असा संतप्त सवाल करत मनसे नेते संदीप देशपांडे यांनी मुंबई महापालिका प्रशासनावर जोरदार टीका केली आहे.

मासे कापल्यामुळे परिसरात दुर्गंधी आणि अस्वच्छता निर्माण होत असल्याचे कारण देत पालिका प्रशासनाने वाकोला मासळी बाजारातील कोळी महिलांना केवळ अख्खे मासे विकण्याच्या सूचना दिल्याचा दावा करण्यात आला आहे. आदेशाचे पालन न केल्यास कारवाईचा इशाराही देण्यात आल्याचे सांगितले जात आहे. या निर्णयामुळे मासे विक्रेत्यांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले असून, कोळी बांधवांनी हा निर्णय मनमानी असल्याची प्रतिक्रिया दिली आहे. यावर



प्रतिक्रिया देताना संदीप देशपांडे म्हणाले, ज्यांना माशांचा वास सहन होत नाही त्यांनी सरळ गुजरातला जावे. मुंबईतील कोळी बांधवांनी आता मासे विकायचे नाहीत तर जिलेबी-फाफडा विकायचा का? इथे राहायचे असेल तर मराठी माणसाप्रमाणे राहावे लागेल.

## मंदिरांच्या ‘इनामी’ जमिनी रद्द पुनर्विकासासाठी भूखंड खुले

**नवा कायदा आणण्याचा प्रस्ताव**

■ मुंबई

**राज्यातील** देवस्थान इनाम जमिनींबाबत राज्य सरकारने एक अत्यंत महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे राज्यातील मंदिरांकडे असलेली ‘इनामी’ म्हणून लाखो हेक्टर जमीन रद्द होऊन हे मोठे भूखंड पुनर्विकासासाठी खुले होण्याची शक्यता आहे. दरम्यान,सरकारने ‘महाराष्ट्र देवस्थान इनाम निर्मूलन कायदा, २०२६’ या मसुद्यावर जनतेकडून ५ जूनपर्यंत हरकती व सूचना मागविल्या आहेत.

हा नवीन कायदा सध्याच्या स्वरुपात लागू झाल्यास देवस्थान जमिनींच्या हस्तांतरणावरील निर्बंध हटवले जाणार आहेत. त्यामुळे या जमिनींवर विकासकामे करणे शक्य होईल. तसेच अनेक वर्षांपासून या जमिनी कसणाऱ्या शेतकऱ्यांना/वहिवाटदारांना त्यांच्या नावावर मालकी हक्क मिळण्याचा मार्ग मोकळा होईल. जमिनी हस्तांतरणासाठी अधिमुल्य संबंधित देवस्थानला मिळणार असून, त्यातून मंदिरांची व्यवस्था सुधारली जाईल. या कायद्याचा मसुदा ऑनलाईन उपलब्ध करून लोकांच्या हरकती व सूचना मागवल्या जातील आणि जुलै २०२६ च्या अधिवेशनात यावर अंतिम निर्णय घेतला जाईल. हा कायदा आधीपासून तीन विशिष्ट कायदे लागू असलेले भाग वगळता संपूर्ण महाराष्ट्रात लागू होईल.

## बंगाल, तामिळनाडूतील पराभवानंतर ‘सपा’चा आय-पॅकला दूर ठेवण्याचा निर्णय

■ लखनौ

**अखिलेश** यादव यांच्या समाजवादी पक्षाने २०२७ च्या उत्तर प्रदेश विधानसभा निवडणुकीसाठी आय-पॅक या प्रचार-प्रसिद्धी कंपनीचे सहकार्य घेण्याचे ठरवले होते. मात्र, बंगाल आणि तामिळनाडू निवडणुकीनंतर समाजवादी पक्षाने आय-पॅकपासून दूर राहण्याचा निर्णय घेतला आहे. पश्चिम बंगाल आणि तामिळनाडू निवडणूक आय-पॅकची मदत घेणाऱ्या तृणमूल आणि द्रमुक या पक्षाचा दारुण पराभव झाल्यानंतर समाजवादी पक्षाने हा निर्णय घेण्यात आला



पश्चिम बंगालमध्ये ममता बॅनर्जी यांचा तृणमूल काँग्रेस व तामिळनाडूत एम. के. स्टॅलिन यांचा द्रमुकसाठी निवडणूक रणनीती व प्रचार व्यवस्थापनात आय-पॅकची भूमिका होती. अखिलेश यादव यांच्या नेतृत्वाखालील समाजवादी पक्षाने आय-पॅकची नियुक्ती केल्याची औपचारिक घोषणा केली नव्हती. मात्र, निवडणूक प्रचार व्यवस्थापनासाठी संभाव्य सहकार्याबाबत अनेक महिन्यांपासून चर्चा सुरू होती. आता त्या चर्चा थांबवण्यात आल्याचे सांगितले जात आहे. समाजवादी पक्ष आता बाह्य सल्लागार संस्थांवर अवलंबून राहण्याऐवजी स्वतःच्या संघटनात्मक ताकदीवर व अंतर्गत राजकीय यंत्रणेवर भर देऊ इच्छित आहे.

## बीड महसूल घोटाळ्यात कारवाई माजी जिल्हाधिकाऱ्याला अटक

■ बीड

**बीड** जिल्ह्यातील राष्ट्रीय महामार्गाच्या भूसंपादन आणि मोबदला वाटपातील कोट्यवधी रुपयांच्या कथित घोटाळा प्रकरणात मोठी कारवाई करण्यात आली आहे. बीडचे तत्कालीन जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांना पोलिसांनी लातूर येथून अटक केली आहे. या अटकेला पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी दुजोरा दिला असून, या कारवाईमुळे महसूल विभागात प्रचंड खळबळ उडाली आहे. विशेष तपास पथकाने अविनाश पाठक यांना लातूर येथील राहत्या घरातून ताब्यात घेतले. या घोटाळ्याचा तपास विशेष तपास पथकाच्या माध्यमातून सुरू असून, थेट तत्कालीन जिल्हाधिकाऱ्यांवर कारवाई झाल्याने प्रकरणाला गंभीर वळण मिळाले आहे. बीड जिल्ह्यातून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्गाच्या भूसंपादनावेळी शेतकऱ्यांचा मोबदला आणि जमिनीच्या संपादन प्रक्रियेत कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचा आरोप आहे.

## उद्योजक संजय कपूर संपत्ती वाद माजी सरन्यायाधीश मध्यस्थी करणार

■ नवी दिल्ली

**दिवंगत** उद्योगपती आणि अभिनेत्री करिश्मा कपूरचे घटस्फोटीत पती संजय कपूर यांच्या मालमत्तेच्या वाटणीवरून राणी कपूर आणि प्रिया सचदेव कपूर यांच्यात सुरू असलेल्या वादात मध्यस्थ म्हणून माजी सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांची आज सर्वोच्च न्यायालयाने नेमणूक केली.

न्या. जे. बी. पारडीवाला आणि न्या. उज्जल भूयान यांच्या खंडपीठाने आज हा आदेश दिला. तसेच या वादासंदर्भात कुठेही जाहीर वाच्यता करू नका किंवा सोशल मीडियावर




पोस्ट करू नका, अशी सूचनाही दोन्ही न्यायालयाने दोन्ही पक्षांना केली.

हा कौटुंबिक वाद आहे. तो कुटुंबापुरताच मर्यादित ठेवा. तो लोकांच्या मनोरंजनाचा विषय होऊ देऊ नका, असे न्यायालयाने सांगितले. राणी कपूर या संजय कपूर यांच्या मातोश्री आहेत. त्यांचा असा दावा आहे की, २०१७ साली त्यांना हृदयविकाराचा झटका आला होता. त्यावेळी त्यांच्या प्रकृतीचा गैरफायदा घेत मुलगा संजय कपूर आणि सून प्रिया कपूर यांनी त्यांच्या नावाने राणी कपूर फॅमिली ट्रस्ट स्थापन केला आणि त्यांच्या नावावर असलेली मालमत्ता ट्रस्टच्या नावे वळती केली.

## डहाणू-दिवा लोकलच्या डब्यांत गुजराती जाहिराती

■ पालघर

**पालघर** जिल्ह्यात धावणाऱ्या डहाणू-दिवा लोकलमध्ये मराठी भाषेला दुय्यम स्थान दिले जात असल्याचा आरोप होत असून, यावरून मराठी भाषिक प्रवाशांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. लोकलच्या डब्यांमध्ये सर्वत्र गुजराती भाषेतील जाहिराती आणि फलक लावण्यात आल्याने प्रवाशांनी नाराजी व्यक्त केली आहे.

प्रवाशांच्या मते, गाडीच्या डब्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर गुजराती भाषेतील जाहिराती प्रसिद्ध करण्यात आल्या आहेत. अनेक फलकांवर केवळ गुजराती भाषेचाच वापर करण्यात आल्याने, ही रेल्वे महाराष्ट्रात धावते की गुजरातमध्ये? असा सवाल संतप्त प्रवाशांकडून उपस्थित केला जात आहे.

## मोफत पासांच्या मागणीमुळे आयपीएल अंतिम सामना अहमदाबादला हलवला

■ मुंबई

**आयपीएल** २०२६ चा अंतिम सामना बंगळुरूहून अहमदाबादला हलवण्यात आला आहे. सुरुवातीला हा सामना बंगळुरूच्या एम. चिन्नास्वामी स्टेडियम येथे होणार होता. मात्र आता तो अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियम येथे खेळवला जाणार आहे. भारतीय क्रिकेट बोर्ड (बीसीसीआय)ने यामागे



प्रशासकीय आणि लॉजिस्टिक कारणे असल्याचे सांगितले आहे. मात्र, स्थानिक नेते आणि मान्यवरांकडून मोठ्या प्रमाणात मोफत पासांची मागणी होत असल्याने हा निर्णय घेतल्याची चर्चा आहे. गतविजेता संघ रॉयल चॅलेंजर्स बंगळूरुचे घरचे मैदान असल्याने अंतिम सामना बंगळुरूमध्ये होणार होता. पण स्थानिक संघटना आणि प्रशासनाच्या काही मागण्या बीसीसीआयच्या नियमांच्या बाहेर असल्याचे सांगण्यात आले. काँग्रेसचे आ. विजयानंद काशप्पनावर यांनी आमदार हे व्हीआयपी असल्याने त्यांनी सामान्य लोकांप्रमाणे तिकिटांसाठी रांगेत उभे राहू शकत नाहीत, कारण सामान्य लोक तर पैसे देऊन तिकिटे घेतात, असे विधान केले होते.

## शिंदे सेनेचे अमेय घोले यांचा सुधार समितीचा राजीनामा

■ मुंबई

**मुंबई** महापालिकेची सत्ता महायुतीकडे आल्यानंतर तीन महिन्यांतच समित्यांमध्ये बदल करण्यात आले आहेत. शिंदे सेनेचे पालिकेतील गटनेते अमेय घोले यांनी सुधार समितीचा राजीनामा दिला आहे. आता एकनाथ शिंदे यांच्या जवळचे मानले जाणारे आमदार तुकाराम काते यांची सून व नगरसेविका समृद्धी काते यांची सुधार समिती सदस्यपदी निवड केली जाणार आहे. तसेच शिंदे सेनेचे आमदार दिलीप लांडे यांच्या निकटच्या अश्विनी माटेकर यांची शिक्षण समिती सदस्य पदी वर्णी लागणार आहे. सुधार समितीत सध्या २६ सदस्य आहेत. यामध्ये भाजपाचे दहा सदस्य असून, शिवसेना शिंदे गटाचे तीन सदस्य असून, ऊर्वरित सदस्यांमध्ये काँग्रेस, शिवसेना उबाठा, एमआयएम, मनसेचे नगरसेवक आहेत.

## नायब तहसीलदाराला जेसीबीला लटकवून नेले

**मुरुम माफियांची दहशत**

■ नागपूर

**नागपूरच्या** कुही तालुक्यात अवैध मुरूम उत्खननावर कारवाई करण्यासाठी गेलेल्या नायब तहसीलदारांना जेसीबीला लटकवून तशाच अवस्थेत तब्बल तीन ते चार किलोमीटर अंतरापर्यंत नेले.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अवैध मुरूम उत्खनन सुरू असल्याची माहिती मिळाल्यानंतर नायब तहसीलदार बुद्धभूषण निकाळजे यांनी महसूल पथकासह घटनास्थळी धाड टाकली. कारवाई सुरू होताच माफियांनी आक्रमक पवित्रा घेतला. एका ट्रॅक्टर चालकाने थेट निकाळजे यांच्या अंगावर ट्रॅक्टर घालण्याचा प्रयत्न केला. मात्र, प्रसंगावधान राखत त्यांनी बाजूला होत स्वतः चा जीव वाचवला. त्यानंतर महसूल पथकाने जेसीबी अडवण्याचा प्रयत्न केला असता चालकाने वाहन वेगाने पळवले. त्याला थांबवण्यासाठी निकाळजे जेसीबीवर चढले. मात्र, चालकाने त्यांना लटकलेल्या अवस्थेतच वाहन चालवत नेले. यात त्यांचा शर्ट फाटला आणि हाताला गंभीर दुखापत झाली. त्यानंतर कुही पोलिसांनी कारवाई करत जेसीबी चालकाला अटक केली.

## वैद्यकीय प्रवेशात मोठा बदल? ‘संस्थात्मक फेरी’ रद्दचा प्रस्ताव

■ मुंबई

**राज्यातील** खासगी वैद्यकीय महाविद्यालयांमधील प्रवेश प्रक्रियेतील मनमानीला लगाम बसणार आहे. राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष (सीईटी सेल) यांनी वादग्रस्त संस्थात्मक फेरी रद्द करण्याचा प्रस्ताव मांडला आहे. या प्रस्तावाला मंजुरी मिळाल्यास सर्व वैद्यकीय प्रवेश प्रक्रिया सरकारी देखरेखीखाली केंद्रीकृत पद्धतीने (कॅप फेऱ्यांद्वारे) राबविली जाणार आहे.

दरवर्षी एमबीबीएससह विविध वैद्यकीय अभ्यासक्रमांच्या प्रवेशावेळी खासगी महाविद्यालयांकडून मनमानी होत असल्याच्या तक्रारी सातत्याने पुढे येत होत्या. काही महाविद्यालयांकडून जागा ‘ब्लॉक’ करून ठेवणे, गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांना प्रवेश नाकारणे, तसेच जादा शुल्काची मागणी करणे, असे प्रकार घडत असल्याचा पालकांचा आरोप आहे. या पार्श्वभूमीवर राष्ट्रीय वैद्यकीय आयोग (एनएमसी) यांनी २०२३ मध्ये सर्व प्रवेश प्रक्रिया कॅप फेऱ्यांद्वारे पारदर्शकपणे राबविण्याचे निर्देश दिले होते. मात्र, २०२४ आणि २०२५ या कालावधीत काही खासगी महाविद्यालयांनी न्यायालयीन परवानगी घेऊन ‘संस्थात्मक फेऱ्या’ घेतल्या होत्या. या फेऱ्यांमध्ये गैरप्रकार होत असल्याच्या तक्रारी वाढल्यामुळे त्या पूर्णपणे रद्द करण्याची मागणी आता जोर धरत आहे.

## उघड्यावर लघुशंका करणाऱ्यांना रोखण्यासाठी भिंतींवर आरसे

**रस्त्यावर थोडासा आडोसा पाहून लघुशंका करणारे लोक आपल्याला सर्रास दिसून येतात. अशा लोकांना रोखण्यासाठी म्हैसूर शहर प्रशासनाने एक अनोखी शक्कल लढवली आहे. प्रशासनाने अशी ठिकाणे हेरून तिथे मोठ मोठे आरसे लावले. जेणेकरून त्या ठिकाणी लघुशंका करण्यासाठी येणाऱ्याला स्वत:ची छबी आरशात दिसेल आणि तो लाजून तिथून निघून जाईल. इंटरनेटवर या मोहिमेचे सध्या फार कौतुक होताना दिसत आहे.**

■ बंगळूरु

**म्हैसूरमध्ये** रस्त्यावर लघुशंका करणारे लोक ही प्रशासनाची डोकेदुखी ठरली होती. अशा ठिकाणांवर दंड ठोठावण्याचा इशारा देणारे फलक लावूनही काही उपयोग होत नव्हता. शेवटी कोणाच्या तरी डोक्यातून ही अफलातून कल्पना निघाली. प्रशासनानेही त्यावर तत्काळ अंमलबजावणी करत शहरातील अशी ठिकाणी हेरून तिथे मोठे आरसे बसवले. या आरशांवर एलईडी लाईटही लावण्यात आले आहेत. जेणेकरून रात्रीच्या वेळीदेखिल हा उपाय कामी येऊ शकेल.



ही कल्पना बऱ्यापैकी यशस्वी ठरत असल्याचे दिसून आले आहे. आरसे लावल्याने रस्त्यावर लघुशंका करण्याचे प्रमाण लक्षणीयरित्या कमी झाले आहे.

## मामाच्या घरी आलेल्या भाच्याकडून १० वर्षीय चिमुकलीवर अत्याचार

■ बीड

**बीड** जिल्ह्यातील केज तालुक्यात एका दहा वर्षीय चिमुकलीवर तिच्याच नात्यातील तरुणाने लैंगिक अत्याचार केल्याची संतापजनक घटना उघडकीस आली आहे. मामा-मामीला भेटण्यासाठी आलेल्या २९ वर्षीय भाच्याने घरात कोणी नसल्याचा गैरफायदा घेत हे कृत्य केल्याचा आरोप आहे. या प्रकरणी युसुफवडगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, आरोपीला अटक करण्यात आली आहे. धाराशिव जिल्ह्यातील इटकुर येथील एक २९ वर्षीय तरुण आपल्या आजोळी मामा-मामीकडे आला होता. रात्रीच्या वेळी मामा आणि मामी हे त्यांच्या दहा वर्षीय मुलीला आरोपीसोबत घरी ठेवून शेतात पिकांना पाणी देण्यासाठी गेले होते. याच संधीचा फायदा घेत आरोपीने चिमुकलीवर लैंगिक अत्याचार केला, असा आरोप आहे. आई-वडील घरी परतल्यानंतर पीडित चिमुकलीने घडलेला प्रकार सांगितला. त्यानंतर कुटुंबियांनी युसुफवडगाव पोलीस ठाण्यात धाव घेत तक्रार दाखल केली.